शुध्द आरोग्यदायी ड्रायफ्रुटस्
काजु, किसमिस, खोबरं, केर सांगरी, मेलन सीडस्, बदाम, काळा मनुका, गाईचे तुप, कागदी बदाम, अंजीर, जरदाळू, धावडा डिंक, अक्रोड, मखाना, मामरा बदाम, चिया सीडस्, मसाला काजू, खारा पिस्ता, खारीक, खजुर, पमकीन सीडस्, खारा बदाम
ड्राईड पायनापल, मँगो, किवी, स्ट्रॉबेरी, पॉमेलो, क्रॅनबेरी, मिक्स फ्रुट
भूमी एजन्सीज सुकामेवा आणि मसाल्याचे ठोक व किरकोळ विक्रेते
मिक्स खडा मसाला उपलब्ध
आनंद कॉम्प्लेक्स, दाळ मंडई, अ.नगर. M. 9011163452

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९–५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहमदनगर, मंगळवार दि. १७.१२.२०२४ | अंक नं. २४२ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020

गोड गोड हुरडा गरम गरम वनभोजन
सहकुटुंब मित्रपरिवारासह निसर्गाचा मनमुराद आनंद घेऊया
संपूर्ण परिवारासह साईबनमध्ये हुरडा पार्टी
२५ पेक्षाही अधिक मनोरंजनाची साधने व इतर बरेच काही
आकर्षक पॅकेज उपलब्ध आजच संपर्क करा
वेळ : सकाळी ९ ते सायं ५
डॉ. कांकरियांचे साईबन
साईबन कृषी पर्यटन केंद्र, एम.आय.डी.सी. मागे, अहमदनगर
हेल्पलाईन - 9112288622
9850500905 / 9096639368

प्रशस्त दालन प्रशस्त वाहनतळ होलसेल विभाग विनम्र सेवा
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

पाहिजेत
अहमदनगर जिल्ह्यातील नामांकित सुवर्णपेढी चंदुकाका ज्वेलर्सच्या अहमदनगर या मुख्य शोरुम साठी हवे आहेत
कॅशियर जागा–2 (M) — बँक, पतसंस्था येथे कॅशियर म्हणुन काम केल्यास प्राधान्य. टॅलीचे ज्ञान आवश्यक. पगार : 17000/-
सेल्समन जागा–5 (M/F) — तत्सम पदावर काम केल्याचा किमान 2 वर्ष अनुभव आवश्यक पगार : 15000/-
अनुभवींना प्राधान्य, आकर्षक पगार दिला जाईल.
इच्छुकांनी सविस्तर अर्ज बायोडाटा सह 7 दिवसांच्या आत समक्ष भेटावे.
शुद्धता, विश्वासार्हता, पारदर्शकता
चंदुकाका ज्वेलर्स – सोने, चांदी व हिऱ्याचे व्यापारी –
वसंत टॉकिज रोड, अहमदनगर 0241-2321512

# जिल्हा गोहत्या मुक्त करण्यासाठी कत्तलखाने त्वरित भुईसपाट करा

## बजरंग दलासह आ.संग्राम जगताप यांची निवेदनाद्वारे जिल्हा पोलीस प्रमुख राकेश ओला यांच्याकडे मागणी

नगर – अहिल्यानगर जिल्हा हा गोहत्या मुक्त झाला पाहिजे यासाठी जिल्हा पोलीस प्रशासनाने कठोर कारवाई करावी, गाय ही हिंदू धर्माची गोमाता आहे, गाईंना वाचविण्यासाठी आमचे सहकार्य राहील, असे आ.संग्राम जगताप म्हणाले

महाराष्ट्र राज्य सरकारने गोमातेला राज्यमाता घोषित केले असून गोवंश हत्या बंदी कायदा असताना देखील काही समाजकंटक त्या कायद्याची पायमल्ली करत आहे, गेल्या आठवड्यात गुन्हे अन्वेषण पथकाकडून अहिल्यानगर जिल्ह्यातील झेंडीगेट, ममदापूर, श्रीरामपूर आदींसह विविध ठिकाणच्या अवैध कत्तलखान्यावर छापा टाकून हजारो गोवंश वाचवण्यात आले असून ५० हजार किलो गोमांस जप्त करण्यात आले आहे. आम्ही वेळोवेळी निवेदन देऊन देखील अवैद्य कत्तलखाने नष्ट करण्याची कोणतीच कारवाई झालेली नाही. तरी तातडीने कत्तलखाने भुईसपाट करावेत. हिंदू समाजाच्या धार्मिक भावना दुखावल्यामुळे हिंदू समाज प्रचंड क्रोधीत झाला आहे. तरी कायदा सुव्यवस्थेचा मोठा प्रश्न निर्माण होऊ शकतो. तातडीने कारवाई करावी, अशी मागणी बजरंग दलाच्या वतीने गोरक्षक प्रमुख पश्चिम महाराष्ट्र प्रांत ऋषिकेश भागवत यांनी जिल्हा पोलीस प्रमुख राकेश ओला यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. यावेळी आमदार संग्राम जगताप, माजी नगरसेवक विपुल शेटिया यांच्यासह गोरक्षक बांधव उपस्थित होते.



जिल्ह्यातील कत्तलखान्यांवर तातडीने कार्यवाही करावी, या मागणीचे निवेदन बजरंग दलाने जिल्हा पोलिस अधीक्षक राकेश ओला यांना दिले. यावेळी आ. संग्राम जगताप. (छाया – लहू दळवी)

गेल्या आठवड्यात गुन्हे अन्वेषण पथकाकडून अवैध कत्तलखान्यावर छापा टाकून हजारो गोवंश वाचवल्याबद्दल बजरंग दलाच्या वतीने यावेळी पोलीस अधीक्षक राकेश ओला, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दिनेश आहेर आणि आ.संग्राम जगताप आदींचा गो मातेची मूर्ती देवून सत्कार करण्यात आला.

जिल्ह्यामध्ये पोलीस प्रशासनाच्यावतीने अवैध कत्तलखान्यावर मोठी कारवाई केली जात असून, गुन्हे दाखल केले आहेत. गोहत्या करणाऱ्यांना तडीपार केले जाईल. गोरक्षकांनी देखील कायद्याचे पालन करावे, जेणेकरून अनुचित घटना घडणार नाही. कत्तलीसाठी जनावरांची वाहतूक करणाऱ्या वाहनांचा पाठलाग करीत असताना एखादा अपघात होण्याची शक्यताही नाकारता येत नाही. तरी पोलीस प्रशासनाशी संपर्क साधावा. आम्ही नेहमीच कठोर कारवाई करत आहोत, अशी माहिती जिल्हा पोलीस प्रमुख राकेश ओला यांनी दिली.

पुन्हा एकदा शिबीर
कान - वयक्लेते कान चिटकवा
नाक - सर्दी खोकला उपाय
डोळा - मोतीबिंदुसाठी ड्रॉप वापरा
स्कीन - टॅटू+मोस+गोंधन काढणे
काळेडाग पिंपल्स खाज येणे
डॉ.मंजुषा 7507718246

वर्धापनदिना निमित्त 5 years anniversary
वर्ष नवे हर्ष नवे बचतीचे पर्व नवे
FLAT 50% OFF ON MRP
18th - 25th Dec 2024
ON ALL BRANDED COMPANY PRODUCTS
Crockery | Appliances | Plastic House hold | Steel-Utensils | Presentation Articles | Toy's & more
A Complete Gift & Kitchenware Shopee
OPP. GOLD'S TV CENTRE, SAVEDI ROAD, AHMEDNAGAR - 03. PH. : 0241- 2427002
Franchise by DB VENTURES
SONY GIFTS PVT. LTD. One Step Shop

आपके शहर में पहली बार
भारतीय क्राफ्ट उत्सव
३ डिसेंबरपासून सुरु..
खास आकर्षण
लखनवी चिकन सुट, सहारनपुर फर्नीचर, राजस्थानी बांगड्या, राजस्थानी पेंटिंग्स्, बनारसी साड्या, पश्चिम बंगाल साड्या, चंदेरी सिल्क साड्या, बेड कव्हर्स, दिवान सेट, केरळ ज्वेलरी, सतरंजी, मोजडी, फॅन्सी चप्पल, लेदर बॅग्स्, टॉप्स, टी-शर्टस्, कारपेट, पंजाबी सुट, मंगलगिरी ड्रेस मटेरिअल्स, जयपुरी जूती, ब्लॉक प्रिंट, खुर्जा क्रॉकरी, टेराकोटा वगैरे
विविध प्रकारच्या हॅन्डीक्राफ्ट व हॅन्डलूम बनावटीच्या वस्तु सवलतीच्या दरात खरेदी करण्याची सुवर्ण संधी !
मोफत प्रवेश व पार्किंग
स्थळ - तांबटकर माळा ग्राउंड पारिजात कॉर्नर चौक, गुलमोहर रोड, अहिल्यानगर (अहमदनगर)
वेळ : सकाळी 10.30 ते रात्री 10.00 पर्यंत

संकष्ट चतुर्थी उपवासासाठी स्पेशल
टक्कर
बुधवार दि.१८ डिसेंबर चंद्रोदय ०८.५७ मी.
काजु- पॅटीस, शाबुदाणा वडा, कैलास उडपी
उपवासाची स्पेशल मलाई लस्सी
शिवशक्ती अपार्टमेंट, खिस्त गल्ली, अ.नगर

An ISO 9001:2015 Certified
DiSHA COMPUTER INSTITUTE
MAHA DISCOUNT offer
Just in 1800 Any Course JOIN TODAY
MS-OFFICE, ADV. EXCEL, TALLY PRIME, PHOTOSHOP, CORELDRAW, ILLUSTRATOR, INDESIGN, C, C++, HTML, 2D CAD, 3D CAD
9371051769 9371151769 7447761769

आपल्या आवडीचा सिनेमा पहा
₹150/-* पासून
नव्याने सुरु झालेल्या Ahilyanagar's First Dolby Atmos & Most Luxurious थिएटरमध्ये...
3 Screens 3X Entertainment
* नियम व अटी लागू.
Book your tickets at BOX OFFICE
bookmyshow
Dolby Atmos DOLBY 7.1 SURROUND
सिनेलाईफ™ मिनिप्लेक्स
नगर कॉलेज जवळ, Zudio च्या वरती, अ.नगर
9881300400, 0241-2346000
टीप: शो च्या वेळा बदलू शकतात | *सदर तिकीट दर फक्त सोमवार ते गुरुवारच्या मर्यादित शोसाठीचे असून तिकीट दर बदलू शकतात

नऊवे पुण्यस्मरण
सब कुछ होने के बावजूद भी कुछ भी नहीं है, ऐसा लगता है आपके बिना, यह परिवार खाली है
स्व.श्रीमती गुलाबबाई मगनलालजी बोरा
स्व. दि. १८/१२/२०१५
आपल्या पावन स्मृतिस भावपुर्ण श्रद्धांजली..
शोकाकुल
सौ. दिपाली – देवेंद्र बोरा
सौ. निता – जितेंद्र बोरा
सौ. कल्पना – कुमोदजी चंगेडिया (सोनई)
चि. रोहित, श्रेणिक, कु. त्रिशला, अलिषा, ईशा
एवंम बोरा परिवार (आश्वीवाला)
नाविन्य साडी सारडा लेन, अहमदनगर
Rawmart Material Solutions Private Limited
Pune-Ahmadabad

## जाहीर प्रकटन

या जाहीर प्रकटनने अहिल्यानगर येथील तमाम लोकांस कळविणेत येते की, आम्ही नोटीस देणार १) श्री. विर नथुराम मनोदिया. २) श्री. मुकेश नथुराम मनोदिया ३) श्री संतोष नथुराम मनोदिया व ४) श्रीमती सुनिता श्याम कंडारे, सर्व राहणार भिंगार. जि. अहिल्यानगर हे कळवितात की आमचे मोठे भाऊ नरेश नथुराम मनोदिया बरोबर आमचा कुटूंबीक मतभेद झाला आहे व त्यांच्याकडुन आमच्या कुटूंबास व परिवारास नित्य आर्थिक व मानसिक त्रास होत आहे. त्याला आमच्या कुटुंबाकडुन व कुटूंब प्रमुखाकडुन वेळोवेळी समज व सुधारणा कामी प्रयत्न केले आहे, परंतु त्याच्या वर्तवणुकीस व कृत्यास कोणतेही बदल झालेले नाही, तसेच भविष्यात होणार नाही असे दिसुन येत असल्यामुळे कुटूंबाचे हितासाठी व सुरक्षा कामी कुटूंबातील सर्व व्यक्तीने व सर्व मुखानी एकमत होऊन सदरचे इसमाशी कुटुंब वारसा व नातेसंबंध कायमचे या प्रकटनाव्दारे तोडत आहे. तसेच या इसमाशी आमचे कुटूंबाशी कोणतेही नातेसंबंध, हक्क व अधिकार राहीलेले नाही तसेच समाजातील इतर लोकांशी कोणत्याही प्रकाराचे व्यवहार केल्यास त्याबाबतची कोणतीही जबाबदारी आमची नाही असे या प्रकटनाव्दारे तमाम नागरीकास समज दिली जात आहे. तरी आमचा त्याच्याशी व त्याचा मुलगा नामे वैभव नरेश मनोदिया व त्याची सुन भाग्यश्री वैभव मनोदिया बरोबर कोणताही संबंध राहिलेला नाही व त्यांचे कोणत्याही कृत्याला आमचा कसलाही संबंध नाही, त्यासाठी आम्ही जबाबदार नाहीत. त्यामुळे त्यांनी केलेल्या कोणत्याही कृत्यास आम्हास जबाबदार धरण्यात येवु नये. व त्यांच्या बाबतीत कोणीही आम्हास संपर्क करू नये. या कारणांस्तव हा जाहीर प्रकटन देत आहोत.

दि. १७/१२/२०२४
अहमदनगर.

ॲड. अक्षय मच्छिंद्र भांड
डिस्ट्रीक्ट अँड सेशन कोर्ट, अहमदनगर.
मो. नं. ९९७५४५५५२५/९५४५१५९११५

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

## सहकारातून समृद्धीकडे...

सहकार - लोकशाही राजप्रणालीत सर्वसामान्यांसह एकूणच समाजाच्या सर्वांगिण प्रगतीसाठी सहकार ही एक सक्षम संज्ञा!

भारतात सहकाराची सर्वोत्तम चळवळ आपल्या महाराष्ट्रासह उत्तरप्रदेश, गुजरात या राज्यांमध्ये वाढली. विशेषतः साखर कारखाने, बँका, पतसंस्था, दूध व्यवसायामध्ये सहकार रुजला, वाढला, फोफावला.

सहकाराने प्रगतीत सिंहाचा वाटा उचलला असला तरी केवळ ५-१० घराण्यांच्या स्वार्थापुरती न राहता सहकाराचा सदुपयोग सर्वसामान्य व ग्रामीण जिरायती शेतकरी व शेतमजुरांसाठी होणे गरजेचे आहे.

नुकतीच भारतात आंतरराष्ट्रीय सहकार परिषद झाली. केंद्र सरकारने सहकाराचे महत्त्व लक्षात घेऊन स्वतंत्र सहकार खात्याची निर्मिती केली.




केंद्राने २०२८ पर्यंत ५ ट्रिलीयन डॉलरची व महाराष्ट्र सरकारने १ ट्रिलीयनचे लक्ष्य ठेवले आहेच. सुदैवाने भ्रष्टाचाराचे डाग नसलेले व उच्चशिक्षित मुख्यमंत्री लाभल्याने आपले राज्य एक नंबरवर राहिले याचा विश्वास वाटतो.



या विकसित अर्थव्यवस्थेच्या लक्ष्य पूर्ततेसाठी शासन, प्रशासनासह सर्वांनाच जागृत राहावे लागेल. शेती, शेतीपूरक व्यवसाय वृद्धीसाठी सहकाराची प्रगती अत्यावश्यक आहे. या सहकाराच्या विकासातूनच देश विकसित राष्ट्र होईल.

# नगरमध्ये दांडके, तलवारीसह धुडगूस घालणाऱ्या आरोपीवर कारवाई करावी

### पोलिस अधिक्षकांकडे नागरिकांची मागणी, अवैध धंदे व गुंडांच्या दहशतीने लोकांचे जगणे मुश्किल

नगर - शहरातील रामवाडी झोपडपट्टीत घुसून दहशत माजविणाऱ्या गुंडासह त्याच्या टोळीवर झोपडपट्टी दादा प्रतिबंधक कायदा (एमपीडीए) व अ‍ॅट्रॉसिटी कायद्यानुसार कारवाई करण्याची मागणी रामवाडीच्या नागरिकांनी केली आहे. नागरिकांच्या शिष्टमंडळाने जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला यांची भेट घेऊन कारवाई करण्याचे निवेदन दिले.



रामवाडी झोपडपट्टीत घुसून दहशत माजविणाऱ्या गुंडासह त्याच्या टोळीवर झोपडपट्टी दादा प्रतिबंधक कायदा व ट्रॉसिटी कायद्यानुसार कारवाई करण्याची मागणी नागरिकांच्या वतीने करण्यात आली आहे.

यावेळी दलित महासंघाचे सुनील उमाप, सागर साठे, प्रकाश वाघमारे, विकास उडानशिवे, पप्पू पाटील, सतीश साळवे, सुरेश वैरागर, रवी साठे, विशाल उल्हारे, भास्कर जाधव, संजय परदेशी, बंटी साबळे, राकेश राजपूत, गणेश ससाणे, पप्पू पाथरे, सोमनाथ अडागळे, राहुल मंडलिक, अमोल लोखंडे, विशाल कांबळे, कांता खुडे, मोना गाडे, अलका साबळे, मंगल चांदणे, अनिता चांदणे, अंजली शेलार, वैशाली साबळे आदींसह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

रामवाडी झोपडपट्टीत रविवारी (दि.१५) रात्री घुसून वाहनांची तोडफोड करुन दांडके व तलवारीने मारहाण केल्याप्रकरणी सूरज जाधवसह पाच जणांवर तोफखाना पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरील आरोपी कायम रामवाडीत दमदाटी करुन दशहत निर्माण करत आहे. झोपडपट्टीत त्यांचे अनेक अवैध व्यवसाय असून, बिंगो जुगाराची स्थानिक नागरिकांनी तक्रार केल्याने त्याचा राग मनात धरुन रामवाडीत ४० ते ५० जणांच्या टोळक्यांसह धुडगूस घालण्यात आला आहे. तर दिसेल त्याला मारहाण करण्यात आली असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

रविवारी घडलेला मारहाणीचा प्रकार स्थानिक सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झालेला आहे. या प्रकारामुळे परिसरातील नागरिक भयभीत झाले असून, येथील अवैध धंदे व गुंडांच्या दहशतीने लोकांचे जगणे मुश्किूल झाले आहे. सदर आरोपीवर पोलीस स्टेशनमध्ये अनेक गंभीर प्रकारचे गुन्हे दाखल असून, तो कायम गरीब, दलित, मागासवर्गीय युवकां टार्गेट करत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

# सारसनगरमधील सराईत गुंड एमपीडीए कायद्यान्वये स्थानबद्ध

### जिल्हाधिकाऱ्यांच्या मंजुरीनंतर नाशिक कारागृहात केली रवानगी

नगर - गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असलेला सराईत गुन्हेगार ऋषिकेश उर्फ भावड्या अशोक बडे (वय २६, रा. सारसनगर) याच्यावर पोलिसांनी एमपीडीए कायद्यान्वयेस्थानबद्धतेची कारवाई केली आहे. जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी प्रस्तावास मंजुरी दिल्यानंतर भिंगार कॅम्प पोलिसांनी त्यास ताब्यात घेत त्याची नाशिक मध्यवर्ती कारागृहात रवानगी केली आहे.



सारसनगर येथील सराईत गुन्हेगार ऋषिकेश उर्फ भावड्या अशोक बडे याच्यावर एमपीडीए कायद्यान्वये स्थानबद्धतेचा प्रस्ताव मंजूर झाल्यावर त्याला ताब्यात घेतले असता त्याच्या समवेत भिंगार कॅम्पचे पोलिस पथक.

भिंगार कॅम्प पोलिस स्टेशनच्या हद्दीत सारसनगरमध्ये राहणाऱ्या ऋषिकेश बडे हा त्याचे साथीदारासह खुनाचा प्रयत्न, दरोडा, खंडणी, वाहनावर पेट्रोल टाकुन नुकसान करणे, घातक शस्त्राने मारहाण करुन जिवे मारण्याची धमकी देणे अशा प्रकारचे गंभीर स्वरुपाचे गुन्हे करुन तेथील सारसनगर व पोलिस स्टेशन हद्दीत राहणाऱ्या सर्व सामान्य नागरिकांवर दहशत निर्माण करत होता. त्यामुळे नगर व भिंगार परिसरातील सार्वजनिक सुव्यवस्था बाधीत झाली होती. सराईत गुन्हेगार ऋषिकेश बडे याच्या समाजविघातक कृत्यांना आळा घालण्यासाठी प्रचलीत कायद्यान्वये करण्यात आलेल्या प्रतिबंधक कारवाया परिणामकारक ठरत नव्हत्या. त्याच्या गुन्हेगारी कृत्यांना प्रतिबंध होणेसाठी भिंगार कॅम्पचे स.पो.नि.जगदिश मुलगीर यांनी त्याच्या विरुद्ध एमपीडीए कायद्यान्वये प्रस्ताव तयार करुन तो पोलीस अधिक्षक राकेश ओला यांना सादर केला होता. सदर प्रस्तावाची पोलीस अधिक्षक ओला यांनी बारकाइने पडताळणी करुन सदरचा प्रस्ताव हा शिफारस अहवालासह जिल्हादंडाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांना सादर केला होता.

नमुद प्रस्तावाची व सोबतच्या कागदपत्राची जिल्हा दंडाधिकारी सिद्धराम सालीमठ यांनी पडताळणी करुन नगर जिल्ह्याची सार्वजनिक सुव्यवस्था अबाधित रहावी या करीता सराईत गुन्हेगार ऋषिकेश उर्फ भावड्या अशोक बडे यास एमपीडीए कायद्यान्वये स्थानबद्ध करण्याचे आदेश काढले. त्यानंतर भिंगार कॅम्पचे स.पो.नि.जगदिश मुलगीर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक योगेश शिंदे, स.फौ. कैलास सोनार, रमेश वराट, पो. हे.कॉ. दिपक शिंदे, रवी टकले, पो.कॉ. प्रमोद लहारे, अमोल आव्हाड, महादेव पवार यांच्या पथकाने त्यास ताब्यात घेऊन त्याला नाशिक मध्यवर्ती कारागृह येथे स्थानबद्ध केले आहे.

# परिचारिकेचा विनयभंग करून मारहाण, युवकावर गुन्हा दाखल

नगर - शहरातील एका हॉस्पिटलमध्ये काम करणाऱ्या २५ वर्षीय विवाहित परिचारिकेचा विनयभंग करत तिला धमकी देऊन मारहाण केल्याची घटना शहराच्या मध्यवर्ती भागात घडली.

शहराच्या मध्यवर्ती भागात एका हॉस्पिटलमध्ये काम करणाऱ्या २५ वर्षीय विवाहित परिचारिकेवर योगेश जगदीप सगळगिळे (रा. कोठी) हा तरुण लक्ष ठेवायचा तसेच माझ्यासोबत बोल असे काय म्हणायचा. याबाबत परिचारिकेने तिच्या पतीस सांगितले होते. रात्रीची ड्युटी असल्याने योगेश सगळेगिळे हा रात्री दोन वाजेच्या सुमारास हॉस्पिटलच्या गेटवर गेला व परिचारिकेस तू माझ्याबरोबर चल, मला तुझ्याबरोबर बोलायचे आहे, तू जर बाहेर आली नाहीस तर तुला मारून टाकीन असे म्हणून तिला मारहाण करून तिचा हात धरून विनयभंग केला. यावेळी हॉस्पिटलचा इतर स्टाफ तेथे आल्याने तो तेथून पळून गेला. याप्रकरणी कोतवाली पोलिसांनी पिडीत परिचारिकेने दिलेल्या फिर्यादीवरून सगळगिळे याच्याविरुद्ध विनयभंगाचा गुन्हा दाखल केला आहे.

## पार्किंगमधून दुचाकीची चोरी

नगर - शहरातील लालटाकी परिसरातील स्वास्थ्य हॉस्पिटलच्या पार्किंगमध्ये हॅण्डल लॉक करून लावलेली हिरो कंपनीची मोटारसायकल (क्र.एम एच १६ सी बी १०४६) कोणीतरी अज्ञात चोरट्याने हॅण्डल लॉक तोडून चोरून नेल्याची घटना सोमवारी (दि.१६) सकाळी ९.५० ते सायंकाळी ७ या कालावधीत घडली.

याप्रकरणी गणेश राजू साठे (वय २७, रा.लक्ष्मीमाता मंदिराशेजारी, सिद्धार्थनगर) यांनी दिलेले फिर्यादीवरून तोफखाना पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०५ (ब) नुसार गुन्हा दाखल केला आहे.

# निंबळक बायपासवरील अपघातात तरुणाचा मृत्यू

नगर - दुचाकीचा अपघात झाल्याने एका तरूणाचा मृत्यू झाला. आकाश दिलीप पवार (वय ३५, रा. मनमाड, जि. नाशिक) असे मयत तरूणाचे नाव आहे. निंबळक (ता. नगर) शिवारात ब्रीजवर ही घटना घडली. या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

रविवारी (दि.१५) दुपारी आकाश पवार हे त्यांच्याकडील दुचाकीवरून नगर- मनमाड रस्त्याने राहुरीकडे जात असताना निंबळक शिवारात ब्रीजवर त्यांच्या दुचाकीचा अपघात झाला. या अपघातात गंभीर जखमी झालेल्या आकाश पवार यांना उपचारासाठी येथील जिल्हा रूग्णालयात दाखल केले. दरम्यान, तेथील डॉक्टर बटुळे यांनी त्याची तपासणी करून त्याला उपचारापूर्वीच मयत घोषीत केले. अधिक तपास पोलीस अंमलदार कावरे करत आहेत.





लालटाकी परिसरातील अतिक्रमणे हटविताना महापालिकेचे अतिक्रमणविरोधी पथक. (छाया - बबलू शेख)

# लालटाकी परिसरातील अतिक्रमणे महानगरपालिकेकडून जमीनदोस्त

### पत्र्याचे सहा शेड आणि बंद टपऱ्या हटविल्या, सलग दुसऱ्या दिवशी कारवाई सुरूच

नगर - शहरात सलग दुसऱ्या दिवशीही महापालिकेने अतिक्रमण हटाव मोहीम सुरू ठेवली असून, दुसऱ्या दिवशी मंगळवारी (दि. १७) लालटाकी परिसरातील अण्णाभाऊ साठे चौकातील कच्ची, पक्की अतिक्रमणे जेसीबीच्या सहाय्याने जमीनदोस्त केली आहेत. यात सहा पत्र्याचे शेड आणि एका राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्याचे पत्र्याचे कार्यालय हटविण्यात आले आहे.

महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांच्या आदेशानुसार अतिक्रमण विरोधी पथकाने कारवाईत सातत्य ठेवत मंगळवारी (दि. १७) लालटाकी परिसरात मोहीम राबविली. स्वास्थ्य हॉस्पिटलसमोर रस्त्यालगत बांधण्यात आलेले पत्र्याचे पक्के शेड पथकाने जेसीबीच्या सहाय्याने जमीनदोस्त केले. त्याचबरोबर अण्णाभाऊ साठे चौकात असलेले अनधिकृत पत्र्याचे शेड, बंद टपऱ्या हटविण्यात आल्या. याच ठिकाणी एका राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्याचे संपर्क कार्यालय होते. संबंधित पदाधिकाऱ्याला पथकाने बोलावून घेत त्या कार्यालयातील साहित्य काढून घेण्यास सांगितले. त्यानंतर दुपारी ते अनधिकृत असल्याने पथकाने जेसीबीच्या सहाय्याने हटविले. रस्त्यालगतची ही पक्की अतिक्रमणे हटविल्याने रस्ता रुंदावला असून, वाहतुकीस येणारे अडथळे दूर झाले आहेत. महापालिकेच्या या कारवाईने अतिक्रमणधारकांचे धाबे दणाणले असले तरी नागरिकांमधून कारवाईचे स्वागत होत आहे. या कारवाईत प्रभाग ३ चे अधिकारी गोडळकर, अतिक्रमण विभाग प्रमुख आदित्य बल्लाळ, क्षेत्रिय अधिकारी देविदास बिज्ञा, रिझवान शेख यांच्यासह कर्मचारी सहभागी झाले होते.

# महापालिकेच्या अधिकाऱ्यांकडून फळ, भाजीविक्रेत्यांना नाहक त्रास

### अन्याय थांबवा अन्यथा कुटुंबियांसह आंदोलनाचा इशारा

नगर - महापालिकेच्या अतिक्रमण विभागाकडून वाडियापार्क, जुने बसस्थानक परिसरातील फळविक्रेते व भाजीविक्रेत्यांवर कारवाई केली जात आहे. अतिक्रमण विभागाचे अधिकारी फळ व भाजीविक्रेत्यांना दररोज त्रास देत आहेत. फळांच्या गाड्या या एका जागेवर कायमस्वरूपी नसतात. त्या फिरत राहतात. या गाड्यांच्या माध्यमातूनच फळ व भाजीविक्रेते आपली उपजीविका करतात. त्यांच्यावर अतिक्रमण विभागाकडून कारवाई होत असून, अधिकारी त्रास देत आहेत. तरी या गरीब लोकांवरील अन्याय थांबवावा अन्यथा त्यांच्या कुटुंबियांसह महापालिकेसमोर आंदोलन करण्यात येईल, असा इशारा अहमदनगर जिल्हा काँग्रेस कमिटीच्यावतीने महासचिव ईमरान बागवान यांनी महापालिका आयुक्तांना दिला आहे. यासंदर्भात आयुक्तांना निवेदन देण्यात आले आहे. यावेळी त्रस्त फळ व भाजीविक्रेते उपस्थित होते.

## राष्ट्रीय कामगार संघटनेच्या जिल्हा उपाध्यक्षपदी उमेश साठे

नगर - राष्ट्रीय कामगार संघटना (अहमदनगर) अहिल्यानगर जिल्हा उपाध्यक्षपदी उमेश साठे यांची निवड करण्यात आल्याची माहिती राष्ट्रीय अध्यक्ष अशोक जाधव यांनी दिली. अहिल्यानगर येथील शासकीय विश्रामगृह येथे राष्ट्रीय कामगार संघटना संस्थापक अध्यक्ष अशोक जाधव धनगावकर यांच्या हस्ते हे नियुक्तीपत्र देण्यात आले. यावेळी राष्ट्रीय उपाध्यक्ष अनिस खा पठाण, राष्ट्रीय सचिव शेख हरून नुरामत, राष्ट्रीय सहसचिव सय्यद रफिक युसुफ मार्गदर्शक तथा बांधकाम कामगार नोंदणी अधिकारी चंद्रपूर आत्माराम धनगर, नाका कामगार प्रदेशाध्यक्ष गोरख गव्हाणे अनेकांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले.



## सुमतीबाई क्षीरसागर यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - सपकाळ हॉस्पिटल, सावेडी येथील रहिवासी श्रीमती सुमतीबाई पुरुषोत्तम क्षीरसागर (वय ८६) यांचे १७ डिसेंबर रोजी सकाळी ७:३० वाजता वृध्दापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्यामागे ३ मुले, ३ सुना, १ मुलगी, जावई, नातु, नाती, असा परिवार आहे. संजय पुरुषोत्तम क्षीरसागर यांच्या मातोश्री होत.

## गणपत (बाळूकाका) कुलकर्णी यांचे निधन



श्रीरामपूर - मांडवे, ता.श्रीरामपूर येथील शेतकरी गणपत (बाळूकाका) कुलकर्णी (मांडवेकर) वय ८९ यांचे वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक भाऊ, दोन मुले, दोन मुली, एक बहिण , सुना, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे. बाबाजी कुलकर्णी यांचे थोरले बंधू, श्री वरदा अ‍ॅक्सिडेंट हॉस्पिटल येथील मेडिकलचे मालक सुनिल कुलकर्णी व महर्षी पतसंस्थेचे अधिकारी अनिल कुलकर्णी यांचे वडील, चि.सिध्देश, अनुज व अथर्व कुलकर्णी यांचे आजोंबा होत.

## किशोर देशपांडे यांचे अल्पशा आजाराने निधन



शेगाव - येथील किशोर काका देशपांडे (वय ७४, शेगाव, ता.खामगाव) यांचे १७ डिसेंबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले.

त्यांच्यावर रायगड कॉलनी येथील महाकाल स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. ते फिनिक्स महाराष्ट्रचे संपादक कुणाल आणि कुशल देशपांडे यांचे वडील होत. त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

# 'प्रशासन गाव की ओर' उपक्रम यशस्वीपणे राबवा

### जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांच्या सूचना

नगर - जिल्ह्यात १९ ते २४ डिसेंबर दरम्यान सुशासन सप्ताहांतर्गत 'प्रशासन गाव की ओर' हा उपक्रम प्रभावीपणे राबवावा आणि नागरिकांच्या समस्या दूर करण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत दिले. जिल्हाधिकारी कार्यालयात दूरदृष्य प्रणालीद्वारे आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, उपजिल्हाधिकारी अतुल चोरमारे उपस्थित होते.

श्री.सालीमठ म्हणाले, कृषी विभागाने शेतकऱ्यांसाठी विविध कार्यशाळांचे आयोजन करावे. विविध महामंडळांनी लाभार्थ्यांना योजनांचा लाभ द्यावा. नाविन्यपूर्ण कल्पना वापरून नागरिकांना विविध सेवा सुलभपणे उपलब्ध करून द्याव्यात. गाव कचरामुक्त किंवा प्लास्टिकमुक्त करण्यासाठी उपक्रम राबवावे. शासकीय विभागांद्वारे देण्यात येणाऱ्या सेवा अधिक सुलभपणे नागरिकांना मिळतील असे नियोजन करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

गावपातळीवर ग्रीसॅट उपक्रम राबविण्यासाठी राबविण्याच्या सूचना श्री.येरेकर यांनी दिल्या. बैठकीस जिल्ह्यातील उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, गट विकास अधिकारी दूरदृष्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

# महायुती सरकारने ओबीसी नेते छगनराव भुजबळ यांना मंत्रिमंडळात स्थान न दिल्याने माळीवाडा येथे निदर्शने

नगर - अहिल्यानगर शहरातील माळीवाडा येथे अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने ओबीसींचे जेष्ठ नेते छगनराव भुजबळ यांना महायुती सरकारने मंत्रिमंडळात स्थान न दिल्याने महात्मा फुले यांच्या पुतळ्याजवळ निदर्शने करून काळी फीत लावून सरकारचा जाहीर निषेध करण्यात आला. यावेळी समता परिषदेचे प्रदेश उपाध्यक्ष अंबादास गारुडकर, जिल्हाध्यक्ष सुभाष लोंढे, महानगर अध्यक्ष दत्ता जाधव, प्रदेश प्रवक्ते डॉ. नागेश गवळी, मदास फुले, अनिल निकम, खंडू भुकन, किसनराव रासकर, गोरख आळेकर, मोहित चौधरी, तुषार भुजबळ, प्रशांत शेरकर, राजू गाडेकर, शाहू होले, संकेत खामकर, सौरभ भुजबळ, निशांत शिंदे आदींसह पदाधिकारी उपस्थित होते.




माळीवाडा येथे अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने ओबीसींचे जेष्ठ नेते छगनराव भुजबळ यांना महायुती सरकारने मंत्रिमंडळात स्थान न दिल्याने येथील महात्मा फुले यांच्या पुतळाजवळ निदर्शने करून काळी फीत लावून सरकारचा जाहीर निषेध करण्यात आला.

सुभाष लोंढे म्हणाले, महायुती सरकारने मंत्रिमंडळ विस्तार केला यामध्ये जाणीवपूर्वक आमचे नेते छगनराव भुजबळ यांना डावलण्यात आले. यामुळे राज्यात असंतोषाची भावना निर्माण झाली आहे. ज्या जेष्ठ नेत्याचा या सरकारने जो अपमान केला त्याचा बदला समता परिषदेच्या माध्यमातून निश्चितच दाखून दिला जाईल, असा इशारा लोंढे यांनी दिला आहे.

अंबादास गारुडकर म्हणाले, छगनराव भुजबळ हे गेली अनेक वर्षापासून ओबीसींच्या मागे भक्कमपणे उभे आहेत ते खरोखर कतुकास्पद असेच आहे परंतु या सरकारला त्यांचे काम योग्य वाटत नसल्याने त्यांना डावलले असल्याची भावना आता सर्वसामान्य जनतेमध्ये निर्माण झाली आहे

यावेळी दत्ता जाधव, डॉ. नागेश गवळी यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी काळी फीत बांधून सरकारचा जाहीर निषेध करण्यात आला.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहमदनगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### हात पाय थंड पडत असतील तर

हिवाळ्याच्या ऋतूच्या आगमनानंतर, थंड हात आणि पाय ही एक सामान्य समस्या बनते. थंड हात-पायांमुळे कामात त्रास तर होतोच पण झोपेवरही परिणाम होतो. शरीराच्या अवयवांमध्ये रक्त प्रवाह योग्य नसल्यामुळे हात-पाय थंड होतात.

## पाककला

### केसरी पेढा

**साहित्य :** २ कप खवा, अर्धा कप साखर, १/४ केशर, १/४ वेलची पूड, दूध

**कृती :** केशरी पेढा तयार करण्यासाठी सर्वात आधी एका बाऊलमध्ये खवा घ्यावा. व तो चांगल्या प्रकारे मोकळा करून घ्यावा. आता एका छोट्या बाऊलमध्ये केशरधागे घालावे. त्यामध्ये १ चमचा दूध घालून केशर घोळून घ्यावे. आता एका नॉनस्टिक पॅन गॅसवर ठेऊन खवा घालून भाजून घ्यावा. खवा ७ ते ८ मिनट पर्यंत भाजून घ्यावा.

आता हा खवा एका प्लेटमध्ये पसरवून घ्यावा व थंड होऊ द्यावा. १५ मिनट नंतर त्यामध्ये वेलची पूड, केशर दूध आणि चवीनुसार साखर घालून चांगल्याप्रकारे मिक्स करावे. तसेच हा खवा अर्धा तास झाकण लावून ठेऊन द्यावा व नंतर कणिक मळतो तसा मळून घ्यावा. आता हवा तसा आकार द्यावा.

## वास्तू

### वास्तुशास्त्र आणि शंख

शंख ही एक वस्तू आहे जिला वास्तूमध्ये खूप महत्त्व आहे. योग्यरित्या ठेवल्यास, ते सकारात्मक उर्जेचा प्रवाह वाढवू शकते आणि घरात शांती, समृद्धी आणि सुरक्षितता आणू शकते. वास्तूनुसार तुम्ही तुमच्या घराच्या मंदिरात किंवा इतर कोणत्याही पवित्र ठिकाणी शंख अवश्य ठेवावा, यामुळे तुमच्या जीवनात सकारात्मक ऊर्जा येते. घरात पूजा करताना शंख वाजवला तर आजूबाजूचे वातावरणही शुद्ध होते आणि सभोवताली ऊर्जा संचारते.

## सल्ला

जेवणानंतर १ चमचा तुळशीचा रस दह्यात मिसळून सेवन केल्याने पचनक्रिया सुधारते.

## सौंदर्य

५-६ तुळशीच्या पानांची पेस्ट १ चमचा दह्यात मिसळा. हे चेहऱ्यावर लावून १०-१५ मिनिटे ठेवा आणि नंतर पाण्याने धुवा. हा फेस पॅक त्वचेला मॉइश्चरायझ करतो आणि चमक वाढवतो. याने चांगली झोप लागण्यासही मदत होते.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

बुधवार, दि. १८ डिसेंबर २०२४

**संकष्ट चतुर्थी, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, मार्गशीर्ष कृष्णपक्ष, पुष्य २४।५८, सूर्योदय ०६ वा. ३४ मि. सूर्यास्त ०६ वा. १५ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** आज आपणास अनुकूल वार्ता मिळतील.

**वृषभ :** कौटुंबिक वातावरण आनंददायी राहील. धनाच्या रुपात यश मिळवा.

**मिथुन :** कौटुंबिक विषयांमध्ये आपणास समर्थन मिळेल.

**कर्क :** शत्रूंना मात द्याल. आज आपणास यश मिळेल.

**सिंह :** व्यापार-व्यवसायात स्थिती सुखद राहील.

**कन्या :** आपल्या प्रिय व्यक्तीबरोबर वेळ घालवा. व्यवसायात प्रगती कराल. स्थिती अनुकूल राहील.

**तूळ :** आरोग्य उत्तम राहील. महत्वपूर्ण कार्यात यश मिळेल.

**वृश्चिक :** वाद-विवाद टाळण्याचे प्रयत्न कराल. वाहनांचे नुकसान होईल.

**धनु :** मनावर नियंत्रण ठेवा. एखाद्या विशिष्ट योजनेला बराच वेळ जाईल.

**मकर :** कार्यक्षेत्रात वेगाने कार्य करा पण घाई नुकानकारक ठरेल.

**कुंभ :** वेळ अनुकूल आहे. कामांमध्ये प्रगती होईल. आरोग्य उत्तम राहील.

**मीन :** आपल्या इच्छेवर आणि मनस्थितीवर संयम ठेवाल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## हसा आणि शतायुषी व्हा!

**संता :** काल मी माझ्या बायकोला ड्रायव्हर बरोबर सिनेमाला जाताना पाहिलं

**बंता :** अरे मग तू पण तिच्या मागोमाग जायचास ना सिनेमाला, म्हणजे काय ते तुला कळल असतं...


**संता :** अरे बर झालो नाही गेलो ते, तो सिनेमा मी आधी पहिला होता...

## ...वाढवूया आपले सामान्य ज्ञान

* अटाफू बेटे कोणी शोधून काढली? - जॉन बेरॉन
* कूक सागरी बेटे किती बेटांचा मिळून समूह तयार होतो? - १५ बेटांचा
* कूक बेटांमधील सर्वात लोकप्रिय खेळ कोणता मानला जातो? - रग्बी
* लिहाऊ प्रवाह खडक कोणी शोधून काढले? - जॉन लिहाऊ

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## शब्दगंध क्र. ७०७३ सौ.शैलजा कुलकर्णी



**शब्दगंध क्र. ७०७२ चे उत्तर**



**आडवे शब्द :-** १) त्या त्या वेळेला अनुसरून सुचण्याचा गुण ७) ओकारी येईल असे वाटणे ८) एक रंग; हळदीचा रंग ९) हल्ला; आक्रमण; छापा १०) हिंदू वर्षाचा अकरावा महिना १२) अवडंबर; प्रतिष्ठा; आमांश १३) केशवर्धक तेल देणारी एक वनस्पती १५) वंदन करण्यासाठी वापरला जाणारा एक शब्द; रामराम १६) अनंत; अगणित; असंख्य १७) कोणत्याही वस्तू; माल १९) ऐट; तोरा; रुबाब २०) गादी; तख्त २२) रस्ता ; पथ; मार्ग २३) शंकराचे निवासस्थान

**उभे शब्द :-** १) अगदी सारखे; तुल्य २) घाण; विष्ठा ३) भाषेतील एक अलंकार ४) जमिनीत रोवलेला अणकुचीदार खांब ज्यावर पूर्वी मृत्युदंडाची शिक्षा दिली जायाची ५) संपूर्ण अंगभर एकाच रंगाची किंवा पिंगट रंगाची गाय ६) कागदाचे चार बंद; आच; ताप ९) आघात; जखम; वार ११) खाद्यपदार्थाचा वगैरे पसरलेला सुवास १२) या काचेत प्रतिबिंब दिसते; दर्पण १३) आईचा भाऊ; मातुल १४) फळाचा कापलेला भाग किंवा फोड १६) एक आंबटगोड फळ १८) तालुक्याचे वसुलाचे काम; महत्त्व १९) दीप; दीपक २१) एक प्रवासी वाहन

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार :** जी माणसं आपला विचार बदलू शकत नाही ते आयुष्यात काहीही करू शकत नाही.

## मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

### बँकांची सुरुवात कशी झाली?

बँक हा शब्द इटालियन 'बँको' या शब्दापासून आलेला आहे. बँकोचा अर्थ 'बाकडे.' मध्ययुगीन कालखंडात इटालियन लोक बाकांवर बसून आपले आर्थिक व्यवहार करायचे; यामुळे पैशाचे व्यवहार करण्याचे ठिकाण म्हणजे 'बँको' असे समीकरण झाले. त्या बँकोचे पुढे बँक झाले.

आधुनिक बँकांची सुरुवात व्हेनिस येथे १५८७ साली झाली. यासाठी 'बँको दि रिआल्तो' ची स्थापना झाली. या बँकेत लोक पैसे ठेवायचे नि हवे तेव्हा पैसे काढूनही घ्यायचे. पुढे ही प्रथा लोकप्रिय होऊन जगभर पसरली. बँकांची दोन महत्त्वाची कामे असतात. लोकांकडून पैसे घेऊन ते सुरक्षित ठेवणे, त्यांना हवे तेव्हा ते परत देणे हे पहिले महत्त्वाचे काम आणि गरजू लोकांना व्याजाने पैसे देणे, तसेच निरनिराळ्या उद्योगधंद्यांच्या वाढीस मदत करणे हे दुसरे महत्त्वाचे काम.

'बँको द रिआल्तो' चा कारभार 'बँको दि गिरो'ने हाती घेतल्यावर या आद्य बँकेत आणखी एक नवी सोय सुरू झाली. ती म्हणजे लोक आपले जडजवाहीर व सोने-नाणे सुद्धा पावती घेऊन बँकेत सुरक्षित ठेवू लागले.

अमेरिकेत १७८२ मध्ये, इंग्लंडमध्ये १८२५ मध्ये तर भारतात १८०४ मध्ये पहिली बँक सुरू झाली. भारतात अधिकृतरीत्या १८०४ मध्ये पहिली बँक सुरू झाली असे म्हटले जाते तरी खरे तर भारतालाच बँक व्यवहाराचा जनक मानायला हवे; कारण पतपेढी आणि हुंडीचे व्यवहार कित्येक शतके भारतात चालूच होते. भारतीय रिझर्व बँकेची स्थापना १९३५ मध्ये झाली. ही बँक भारतीय चलनाचा बटवडा करते.

## लखन मृगाची गोष्ट


अनेक वर्षांपूर्वी मगध जनपद नावाचे एक नगर होते. त्याच्याजवळ एक घनदाट जंगल होते. जिथे हरणांचा एक कळप राहायचा. हरीण राजाला दोन मुले होती. त्यामधील एकाचे नाव लखन दुसऱ्याचे नाव काला होते. जेव्हा राजा वृद्ध झाला तेव्हा त्याने आपल्या दोन्ही मुलांना उत्तराधिकारी घोषित केले. दोघांच्या भागामध्ये ५००-५०० हरीण आले.

लखन आणि काला उत्तराधिकारी बनल्यानंतर काही दिवसांनी मगधच्या लोकांवर शेतात पीक कापण्याची वेळ आली. व त्यामुळे वन्य प्राण्यांपासून पिकांचे संरक्षण करण्यासाठी शेतकऱ्यांनी शेताजवळ विविध प्रकारची उपकरणे लावली. हरणाच्या राजाला याची माहिती मिळताच त्याने आपल्या दोन्ही मुलांना आपापल्या गटासह सुरक्षित डोंगराळ भागात जाण्यास सांगितले. वडिलांनी सांगितले म्हणून लागलीच काला आपल्या कळपाला घेऊन पर्वताकडे निघून गेला. त्याने थोडा देखील विचार केला नाही की दिवस लोक त्यांची शिकार करतील. व झाले तसेच. वाटेमध्ये अनेक हरीण शिकारींचे शिकार बनले. तर लखन बुद्धिमान मृग होता. त्यामुळे त्याने आपल्या हरणांस रात्रीच्या अंधारात पर्वताकडे जाण्याचा निर्णय घेतला आणि सर्वजण सुखरूपपणे पर्वतावर पोहोचले.

काही महिन्यांनी पीक कापणी झाल्यावर लखन आणि काला पुन्हा जंगलात परतले. ते दोघेही गटासोबत परतले तेव्हा त्यांच्या वडिलांनी पाहिले की, लखनच्या कळपातील सर्व मृग एकत्र आहे आणि कालाच्या कळपातील हरणांची संख्या कमी आहे. यानंतर सर्वांना लखनच्या बुद्धिमत्तेबद्दल आश्चर्य वाटले व सर्वांनी लखनचे कौतुक केले.

**तात्पर्य :** कोणतेही काम करण्यापूर्वी अनेक वेळा विचार करावा यामुळे नेहमी यश मिळते.

## रहमते दर्शन (भाग - १)



लेकिन जब इंसान को महसूस होता है कि उससे प्यार नहीं किया जा रहा है, तो दूसरे व्यक्ति से मिल रही सलाह पर वो ध्यान नहीं देता, उस पर विश्वास नहीं होता। इंसान महसूस करता है कि इस सबके पीछे उनका कोई स्वार्थ होगा। वह प्रेम है जो सब कुछ बदल देता है और संत दर्शनसिंह जी महाराज इस कला में निपुण थे। तभी वे यह शेर कह पाये कि. जोशे मस्ती में बग़लगीर हो बिछुड़े हुए दिल आज इंसान को इंसान बना दे साक़ी।

महाराज जी जानते थे कि सबको प्यार के नशे से भरपूर कर देने से वो खुद ही सच्चे इंसान बन जायेंगे और एक दूसरे को गले से लगायेंगे। प्रत्येक व्यक्ति, जो भी उनके द्वार पर आया उसे प्रेम मिला, सरपरस्ती मिली और वे सब मिल-जुल कर सहयोग से काम करने लगे। अपने एक दूसरे शे'र में महाराज जी कहते हैं :

एक 'दर्शन' ही मिला औरों का गमख्वार हमें
अपने ग़म में तो ज़माने को परेशाँ देखा।

### प्रस्तावना

- मताए-नूर (उर्दू ग़ज़ल-३८)

यहाँ पर महाराज जी कह रहे हैं कि सारा जहान परेशान लोगों से भरा पड़ा है। कुछ लोग ऐसे हैं जो अपनी परेशानियों और समस्याओं से लिपटे पड़े हैं। बहुत कम हैं जो अपनी समस्याओं से ऊपर उठकर दूसरों की समस्याओं को दूर करते हैं। लेकिन वो इंसान, जो प्यार और दया से भरपूर है, दूसरों के दुःख-दर्द को बाँटता है, दूसरों की तकलीफों को सुनता है, उनके डर को दूर करता है, उनके आँसू पोछता है, ऐसा सिर्फ एक ही इंसान है संत-सत्गुरु ।

संत दर्शनसिंह जी महाराज उस बाजू के समान थे, जिससे हर कोई अपने आँसू पोंछ सकता था। उनकी समस्याओं के भार को कम करके वे लोगों के मन को शांत कर देते थे, जिससे वो अन्तर में आध्यात्मिक यात्रा पर जा सके, जिससे वो भजन - अभ्यास में ध्यान टिका सके और अन्तर में ज्योति एवं श्रुति का अनुभव करते हुए अन्दर के मंडलों में उड़ान भर सके ।

भजन-अभ्यास से हमें इस दुनिया की समस्याओं से ऊपर उठने में मदद मिलती है। जब हम अन्तर में प्रभु की ज्योति व श्रुति के साथ जुड़ जाते हैं तो हमारी आत्मा उस दिव्य प्रेम में नहा जाती है, उससे भरपूर हो जाती है। यह अनुभव हमें सरशारी एवं मस्ती से भरपूर कर देता है। कि हम अपने सारे दुःख-दर्द और परेशानियों को भूल जाते हैं। लेकिन कभी-कभी ऐसा होता है कि हम अपनी शारीरिक एवं मानसिक परेशानियों में इतना घिर जाते हैं कि भजन- अभ्यास में ध्यान टिकाना मुश्किल हो जाता है। ऐसे समय में संत दर्शनसिंह जी महाराज उन लोगों की मदद करते, उनके भार को कम करते जिससे वो भजन-अभ्यास कर सकें। वो उनकी समस्याओं को सुनते और उनका समाधान करते और उन्हें सब प्रकार की कठिनाइयों के भार से मुक्त कर देते ताकि वो भजन कर सकें। भजन - अभ्यास से वो शांति एवं मस्ती की हालत में पहुँच जाते और अपनी ज़िन्दगी में आने वाली प्रत्येक परिस्थिति का हल पा लेते ।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

जब हम अपना सारा ध्यान समस्या पर लगा देते हैं तो हमारा मन एक लेजर बीम बन जाता है। स्नेही या विरोधी व्यक्ति जैसे ही मन में याद आये या उन से वास्तव में आमना सामना हो तुरंत उन के साथ परमात्मा शिव के बिंदू रूप या ईष्ट को देखते रहें और कहते रहें आप शांति के सागर हैं। ऐसा करने से उन व्यक्तियों का बुरा प्रभाव हमारे मन पर नहीं होगा। ऐसा अभ्यास करते रहने से आप लेजर बीम बन जाएंगे। लेजर बीम बनने से आप की राह में आने वाली प्रत्येक बाधा का हल होगा। समय प्रबन्धन और लोग

हमें जन्म मृत्यु तक किसी न किसी मनुष्य के साथ रहना पड़ता है। आप दूसरों के साथ जो समय बिताते हैं और जिस तरह बिताते हैं, वही जीवन में प्रसन्नता और सफलता का आधार है। घर के लोग तथा कार्य स्थल के लोग हमारे जीवन पर बहुत गहरा असर डालते हैं। हम दूसरों से जो कहते हैं या करते हैं, वह सहयोग का आधार बनता हैं। हमारे भविष्य को तय करता है। घर में आप को प्यार करने वाले या जिन्हें आप प्यार करते हैं, वे लोग आप के जीवन की गुणवता तय करते हैं। परिवार के लोगों को आप को टाइम देना होगा। उन्हें १००% समय दें। उस दौरन किसी भी तरह के एलेक्ट्रिक साधनों से दूर रहें। अखबार और किताब भी बंद कर दें। किसी बाधा को प्यार में मत आने दो। पूरे मन से सामने वाले पर ध्यान दें मानो वही आप के लिए संसार का अहम इन्सान हो। आप का दिल और दिमाग पूरी तरह उसके साथ हो। उसके चेहरे की ओर देखें उसकी बात को गौर से सुने और पूरी सजगता से ऊष्मीय प्रतिक्रिया दें और अपना ध्यान उस पर ही लगाए रखें। परिवार में कोई आप से बात करना चाहे तो आप अपने हाथ का काम छोड़ कर उस की ओर ध्यान दें। उस इन्सान को यह अहसास दिलाओ कि उस समय वही आप के लिए दुनिया का सब से महत्वपूर्ण व्यक्ति है।

### अंतरीक बल

सुनने से भरोसा कायम रहता है। आप जितना और जितनी अच्छी तरह सुनेंगे, उसी आधार पर उस व्यक्ति के साथ आप के सम्बन्धों में गर्माहट और भरोसा पैदा होगा। उसकी बात सुनते समय उसके चेहरे और आंखो में देखें। आगे की ओर झुकें। हामी भरते हुए मुस्काऐं और उसके शब्दों को सजग भाव से सुनें। उसकी बात के बीच में न बोलें। किसी की बात के बीच में बोलना ऐसा है मानो आप किसी चलते हुए इन्सान को टांग अड़ा कर गिराना चाह रहे हो। ऐसा करने से उसे गुस्से या कुंठा का अनुभव हो सकता है। आप के प्रति उस की पसंद या भरोसे की कमी आ सकती है। जब आप अपने कार्य में व्यस्त होते उस समय भी घर के लोगों को कल्पना में देखते रहें और उनके साथ परमात्मा शिव के बिंदू रूप या ईष्ट को देखते रहें। परमात्मा आप शांति के सागर है कहते रहें। ऐसा करने से आप को तथा उस को परमात्म बल मिलता रहेगा। इस तरह सम्बन्धों में टकराव नहीं होगा और आप का समय अच्छे कार्यों में लगेगा। समय प्रबन्धन और व्यवहार जब हम दूसरों से उत्तम व्यवहार नहीं करते हैं तो संघर्ष पैदा हो जाते हैं जिन में समय बर्बाद होता है। इसलिए हमें व्यवहार कला का ज्ञान होना चाहिए। जब आप सामने वाले को ध्यान से सुनते हैं तो उसका आत्मविश्वास बढ़ता है।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## आयुर्वेदिक गर्भसंस्कार

गर्भवतीचे आरोग्य चांगले ठेवण्यासाठी जशी योग्य आहाराची गरज असते. तसेच शरीर मन स्वास्थ्यासाठी व्यायामाची देखील गरज पडते. शारीरिक व मानसिक स्वास्थ्य उत्तम असेल तर बाळाची वाढ देखील चांगली होते. पूर्वीच्या काळी स्त्रियांनाच घरातील सर्व कामे करावी लागत होती; त्यामुळे प्रसूतीच्या वेळी ज्या स्नायूंचा वापर करावा लागतो, ते स्नायू आपोआप मजबूत होत असत; त्यामुळे त्या काळी सुलभ, नैसर्गिक प्रसूतीचे प्रमाणही जास्त होत असे. आजच्या काळात स्त्री नोकरीनिमित्त बाहेर पडते; त्यामुळे तिचा मानसिक व शारीरिक त्रास वाढलेला आहे; त्यामुळे बरीचशी कामे ही यंत्राच्या साहाय्याने किंवा मोलकरणीच्या साहाय्याने केली जातात. घरातील कामे करताना जी उठ-बस होते ती आताच्या काळात होत नाही आणि स्नायूंचा वापर न झाल्यामुळे स्नायू शिथील होतात व त्यामुळे प्रसूतीच्या असह्य वेदना गर्भवती सहन करू शकत नाही.

याकरिता गर्भवतीने डॉक्टरांच्या सल्ल्याने प्राणायाम, ध्यानधारणा व योगासने करावीत. प्रसूतीच्या वेळी शरीरातील अनेक स्नायूंचा उपयोग करावा लागतो. शरीरातील रक्ताभिसरण सुधारण्यासाठी, बाळाला जास्तीत जास्त प्राणवायूचा पुरवठा होण्याकरिता प्राणायाम करावा. अनुलोम-विलोम प्राणायाम, शीतली, सीत्कारी, ॐकार गुंजन, गायत्री मंत्र, दीर्घश्वसन यांची साधना रोज आचरणात आणली, तर आईचे व बाळाचे स्वास्थ्य उत्तम राहते.

### गर्भावस्थेतील तपासण्या व लसीकरण

**व्यायाम करताना घ्यावयाची काळजी :**

१) डॉक्टरांच्या सल्ल्यानेच व्यायाम करावा.

२) व्यायाम करताना मऊ, सुती, हलका, सलवार-कमीज किंवा टी शर्ट व स्लॅक घालावी.

३) सकाळी काहीतरी खाल्ल्याशिवाय व्यायाम करू नये, कारण रात्रभर पोटात काहीच नसते.

न खाता व्यायाम केला, तर रक्तातील साखर कमी होऊन व्यायाम करताना चक्कर येऊ शकते.

१. ग्लासभर दूध, एखादे फळ किंवा शिरा, नाचणीसत्त्वाची खीर, नाचणीचा पौष्टिक लाडू हे पदार्थ खाल्ल्यावर अर्ध्या तासाने व्यायाम करावा.

५) सोनोग्राफीमध्ये जर प्लॅसेंटा (वार) गर्भाशयाच्या तोंडाशी असेल, तर हे व्यायाम करू नये, कारण रक्तस्राव होऊन गर्भपात होण्याचा धोका संभवतो.

६) सोनोग्राफीमध्ये गर्भाशयाचे तोंड बंद आहे ना, याची खात्री करून घ्यावी. गर्भाशयाचे तोंड उघडे असल्यास हे व्यायाम करू नये. ज्या व्यायामाने ओटीपोटावर ताण येतो, असा व्यायाम करू नये. व्यायाम करताना मनामध्ये फक्त होणाऱ्या बाळाचाच विचार करावा.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर
मोबाईल नं- ८७९३४००४००

# नगर शहरातील ९० हजार मालमत्तांवर मनपाने लावले 'क्यूआर कोड'; कचरा न उचलल्यास माहिती मिळणार

**कचरा संकलन कामावर नियंत्रण व देखरेख ठेवण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे प्रणाली विकसित : आयुक्त यशवंत डांगे**

नगर – शहरात महानगरपालिकेमार्फत सुरू असलेल्या कचरा संकलन कामावर लक्ष ठेवण्यासाठी, घंटागाडी वेळेत जाते की नाही, संबंधीत भागातील कचरा उचलला गेला की नाही, यावर आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून नियंत्रण ठेवण्यासाठी शहरातील प्रत्येक घराला क्यूआर कोड बसविण्यात येत आहेत. कचरा उचलल्यानंतर कर्मचाऱ्यांना हा क्यूआर कोड स्कॅन करावा लागणार आहे. या माध्यमातून कचरा संकलन व्यवस्था सुरळीत व पूर्ण क्षमतेने राबवली जाण्यास मदत होणार आहे. शहरात सुमारे ९० हजार घरांवर क्यूआर कोड लावण्यात आले असून काम अंतिम टप्प्यात असल्याची माहिती आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी दिली.

शहरात दररोज सुमारे दीडशे टन कचरा जमा होतो. कचरा उचलण्यासाठी खासगी संस्थेमार्फत घंटागाडीचे नियोजन करण्यात आले आहे. मात्र, शहरात अनेक भागात घंटागाडी पोहचत नसल्याच्या, नियमित आणि वेळेत घंटागाडी येत नसल्याच्या नागरिकांच्या तक्रारी आहेत. त्यावर उपाय म्हणून आता नागरिकांच्या घराला क्यूआर कोड लावण्यात येणार आहे. कचरा उचलण्यासाठी आलेल्या कर्मचाऱ्यांना हा क्यूआर कोड स्कॅन करावा लागणार आहे. क्यूआर कोड स्कॅन न केल्यास संबंधित भागातील कचरा उचलल्याची नोंद होणार नाही. शासनाने नियुक्त केलेल्या खासगी संस्थेमार्फत क्यूआर कोड बसविण्याचे काम केले जात आहे. हे काम आता अंतिम टप्प्यात आले आहे.



स्वच्छ भारत अर्बन २.० अंतर्गत सेवांच्या रिअल टाइम मॉनिटरिंगकरिता डिजिटल व आयसीटी आधारीत माध्यमाचा वापर करण्यावर विशेष महत्व देण्यात आले आहे. शहर स्वच्छतेच्या कामाचे, कचरा संकलनाचे रिअल टाइम देखरेख व सनियंत्रण करण्यासाठी माहिती तंत्रज्ञान आधारित आयसीटी प्रणाली लावण्यात येत आहे. घंटागाडी आली अथवा नाही, कचरा घेतल्या गेला किंवा नाही, शहरातील किती नागरिकांनी कचरा वर्गीकृत किंवा मिश्र दिला अथवा कचरा दिला नाही, याबाबत माहिती मिळणार आहे. कचरा संकलन व्यवस्थेत नियमितता येऊन नागरिकांना वेळेत सुविधा मिळेल, असा विश्वास आयुक्त यशवंत डांगे यांनी व्यक्त केला. दरम्यान, केंद्र शासनाच्या संचार मंत्रालयाच्या अखत्यारीतील सार्वजनिक क्षेत्रातील कंपनी आयटीआय लिमिटेड यांच्याद्वारे ही प्रणाली विकसित करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाने दिलेल्या आदेशानुसार ही प्रणाली शहरात कार्यान्वित केली जात आहे.

### घनकचरा व्यवस्थापनामध्ये पारदर्शिता येणार

या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून कचऱ्याची उचल होण्याची त्याक्षणीची माहिती मिळू शकणार आहे. कचरा गाडी आली किंवा नाही, कचरा घेतल्या गेला कि नाही, नागरिकांद्वारे कशा प्रकारचा कचरा म्हणजे विलगीकरण केलेला अथवा मिश्र कचरा दिल्या गेला, घंटागाड्यांचे रूट इत्यादी सर्व माहिती रिअल टाइम स्वरूपामध्ये प्रशासनास उपलब्ध होणार आहे. तसेच, घंटागाड्यांचे रूट मॉनिटरिंग, सफाई कर्मचारी तसेच घंटागाड्यांचे लाईव्ह लोकेशन, ड्युटीवर असताना कर्मचाऱ्यांद्वारे वाया घालवण्यात आलेल्या वेळेबाबत रिपोर्ट, संकलन कर्मचाऱ्यांचे कार्याबाबतचे रिपोर्ट याद्वारे उपलब्ध होणार आहेत.

### कचरा न उचलल्यास प्रशासनाला त्वरीत माहिती

कचरा संकलन करताना घर सुटल्यास प्रशासनास त्वरित माहिती मिळणार आहे. त्यामुळे शहरात कचऱ्याचे ढीग दिसणार नाहीत. या प्रणालीच्या वापराद्वारे सर्व कर्मचाऱ्याची डिजिटल हजेरी शक्य आहे. तसेच कर्मचाऱ्याचे लाईव्ह लोकेशन व कामाची वेळ या बाबतीचे मॉनिटरिंग शक्य आहे. त्यामुळे कर्मचाऱ्याची कार्यक्षमता वाढण्यास तसेच सेवांची गुणवत्ता वाढण्यास मदत होणार आहे.

## श्री प्रविणऋषीजी म.सां.चे चिचोंडी येथे आगमन

नगर – आचार्यसम्राट श्री आनंदऋषीजी म.सा यांचे सुशिष्य अर्हम विज्ञा प्रणेता उपाध्याय प्रवर श्री प्रविणऋषीजी महाराज सा., मधुरगायक श्री तीर्थेशऋषीजी म. सा यांचे आचार्याश्रीजींची जन्मभुमी चिचोंडी (शिराळ) येथे आगमन झाले असून आगामी १२ जानेवारीपर्यंत अर्हम विज्ञाचे विविध शिबीराचे आयोजन करण्यात आले असल्याची माहीती गुरु आनंद फाऊंडेशन आनंदतीर्थच्यावतीने दिली आहे.



छत्रपती संभाजीनगरचा ऐतिहासीक चातुर्मास संपन्न करून पैठण-शेवगाव मार्गे पायी विहार करत गुरुदेवाचे आगमन आनंदतीर्थ, चिचोंडी येथे झाले आहे.

१९ डिसेंबर ते १० जानेवारी २०२५ पर्यंत अर्हम अष्टमंगल अर्हम पुरुषाकार, अर्हम डिस्कवर युवर सेल्फ, अर्हम योग, सीक्रेट ऑफ कर्मा आदी शिबीराचे आयोजन करण्यात येणार आहे. या सर्व कोर्सेसचे ६ महिन्याचे प्रशिक्षण घेऊन उत्तीर्ण झालेल्या प्रशिक्षकांचा सर्टीफिकेशनाचा कार्यक्रम होणार आहे.

सदर शिबीरात महाराष्ट्रासह देशातील विविध प्रांतातील साधक प्रशिक्षक शिबीरातील साधनेसाठी येणार आहे.

सोबतच महासती श्री सुनंदाजी म.सा आदि ६ ठाणा यांचे ही आनंदतीर्थ येथे आगमन झाले असून, दररोज गुरुदेवांचे दर्शन वंदनासाठी भाविकांची गर्दी होत असल्याची माहीती गुरु आनंद फाऊंडेशनच्यावतीने देण्यात आली आहे.

## विरागदर्शनाजी म.सा. पुण्यस्मृतीदिनी हडको जैन धर्मस्थानकात कार्यक्रम

नगर – साध्वीरत्ना विरागदर्शनाजी म.सा. यांच्या चतुर्थ स्मृतीदिनानिमित्त हडको धर्मस्थानकात १५ डिसेंबर रोजी सकाळी ८ ते ९.३० दिव्यदर्शनाजी म.सा., पुनीत दर्शनाजी म.सा. यांचे सान्निध्यात नवकार महामंत्र जाप व तद्नंतर जापसाधना व गुणानुवादन कार्यक्रम झाला. पुनीतदर्शनाजी म.सा. यांचे पूजन झाले. प्रास्तविक हडको श्रावक संघाचे अध्यक्ष विजय गुगळे यांनी केले. महावीरनगर संघाचे अध्यक्ष अनिल कटारिया व सावेडी संघाचे मंत्री संदीप गांधी यांनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी नेमीचंद गांधी परिवाराच्यावतीने लकी ड्रॉचे आयोजन करण्यात आले होते. आचार्य सम्राट आनंदऋषीजी म.सा, भारतमाता प्रमोदसुधाजी म.सा., साध्वीरत्ना विरागदर्शनाजी म.सा. यांचा ध्वनीमुद्रीत मंगलपाठ, दिव्यदर्शनाजी म.सा. यांचा मंगलपाठ व दिव्यदर्शनाजी म.सा. यांच्या मंगलपाठाने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमास हडको, महावीरनगर, सावेडी परिसरातील भाविक उपस्थित होते. कार्यक्रमामध्ये अशोक चोपडा यांच्यावतीने नवकारशीची व्यवस्था करण्यात आली.

# सिनेलाईफ मिनिप्लेक्स सिनेमागृहाचे उद्घाटन; तीन स्क्रीन, डॉल्बी ऍटमॉस मनोरंजनासाठी खुले

**मराठी नाटकांची रंगभूमी गाजवलेल्या कलाकारांनी एकत्र येऊन शहरात सिनेमागृहाची मुहूर्तमेढ रोवणे अभिमानास्पद : आ. संग्राम जगताप**

नगर – नगरकर सिनेरसिकांसाठी अहमदनगर महाविद्यालया शेजारी असलेल्या शहरातील मध्यवर्ती ठिकाणी सुरु झालेल्या सिनेलाईफ मिनिप्लेक्स सिनेमागृहाचे उद्घाटन आ. संग्राम जगताप व उद्योजक नरेंद्र फिरोदिया यांच्या हस्ते झाले. या सिनेमागृहात तीन स्क्रीन, डॉल्बी ऍटमॉस थिएटर मनोरंजनासाठी उपलब्ध करुन देण्यात आले आहे.



सिनेलाईफ मिनिप्लेक्स सिनेमागृहाचे उद्घाटन करण्यात आले.

आ. संग्राम जगताप म्हणाले की, शहरीकरण झपाट्याने वाढत असताना मनोरंजनासाठी नागरिकांना सिनेमागृह उपयुक्त ठरणार आहे. तणावपूर्ण जीवनशैली व धकाधकीच्या जीवनात सिनेमातून मनोरंजन होते. तर काही चांगले सिनेमे जीवनासाठी प्रेरणादायी देखील ठरतात. मराठी नाटकांची रंगभूमी गाजवलेल्या कलाकारांनी एकत्र येऊन सिनेमागृहाची मुहूर्तमेढ रोवणे अभिमानास्पद व प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले.

नरेंद्र फिरोदिया म्हणाले की, शहराचे रूप पालटत असताना, नव्याने झालेल्या सिनेलाईफ मिनिप्लेक्स सिनेमागृहाच्या माध्यमातून शहराच्या वैभवात भर पडणार आहे. नवीन नवीन शोरुम व वास्तुंमुळे शहरातील युवकांना रोजगार देखील उपलब्ध होत असल्याचे त्यांनी सांगितले.

नगर शहरात कुटुंबासह सुरक्षित वातावरणात व दर्जेदार सुविधांसह चित्रपट पाहता यावा यासाठी नगरकर सिनेरसिक वाट पाहत असलेले सिनेलाईफ मिनिप्लेक्स थिएटर सुरु झाले आहे. शहरातील चांदणी चौकातील झुडिओ स्टोअर इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावर अद्ययावत सिनेमागृह सुरू करण्यात आले आहे. या सिनेमागृहात तीन स्क्रीन असलेले सुसज्ज सिनेमागृह नगरकरांच्या पसंतीस उतरणार आहे.

शहराच्या मध्यवर्ती भागात असलेल्या या सिनेमागृहात प्रशस्त पार्किंग, डॉल्बी ७.१ आणि डॉल्बी ऍटमॉस ही साऊंड क्वालिटी असल्यामुळे प्रेक्षकांना चित्रपट पाहण्याचा आनंद द्विगुणीत होणार आहे. त्यामुळे नगरकरांनी तिकीट बुकींगसाठी ९८८१३००४००, ०२४१-२३४६००० या नंबरवर अथवा बुकमाय शो या संकेतस्थळावर संपर्क साधावा, असे आवाहन अखिल भारतीय नाट्य परिषद, अहिल्यानगर शाखेचे अध्यक्ष तथा थिएटरचे संचालक अमोल खोले, चित्रपट निर्माते तथा थिएटरचे संचालक स्वप्निल मुनोत आणि स्वरुप मोरे यांनी केले आहे. या सोहळ्याप्रसंगी कमलेश भंडारी, अभिजीत खोसे, सुर्यकांत खोले, संजय मुनोत, धनश्री खोले, मयुरी मोरे – मुनोत, अक्षय मुनोत, चेतन भंडारी, राकेश भंडारी आदी उपस्थित होते.





माऊली संकुल सभागृहात वधू-वर पालक परिचय मेळाव्याचे उद्घाटन करताना उद्योजक सतीश गवळी पहिल्या छायाचित्रात तर उपस्थित समाजबांधव दुसऱ्या छायाचित्रात.

# वधू-वर मेळावे समाजासाठी काळाची गरज

**सतीश गवळी यांचे प्रतिपादन; राज्यातील तेली समाज एकवटला, संताजी महाराजांचा जय घोषाणे परिसर दणाणले**

नगर – वधू-वर मेळावे समाजासाठी काळाची गरज बनली आहे. व्यवसाय, नोकरी, उद्योगधंदे व शिक्षणानिमित्त समाज विखुरला गेलेला आहे. त्यामुळे मुलांचे लग्न जमविताना मोठ्या अडचणी येतात. समाजाला एका छताखाली आणून त्यांना वधू-वर यांच्या मुलाखतीद्वारे समक्ष पाहण्यासाठी या मेळाव्यातून साध्य होत आहे. लग्न जुळविणे हे पूर्वी पुण्याचे कार्य समजले जायचे. मात्र याचे धंद्यात रुपांतर झाल्याने संस्थेने पुढाकार घेऊन समाजासाठी निशुल्क व्यासपीठ उपलब्ध केले असल्याचे सतीश गवळी यांनी स्पष्ट केले.

अहिल्यानगर शहर व जिल्हा तेली समाज व संताजी विचार मंच (ट्रस्ट) आणि प्रदेश तेली महासंघाच्या वतीने शहरात पार पडलेल्या मोफत वधू-वर पालक परिचय मेळाव्यात राज्यातील तेली समाज एकवटला होता. संताजी महाराजांचा जय घोषाणे संपूर्ण सभागृह दणाणून निघाले. या वधू-वर मेळाव्यासाठी संपूर्ण राज्यातून वधू-वरांसह पालक वर्ग उपस्थित होते.

सावेडी येथील माऊली संकुल सभागृहात झालेल्या वधू-वर पालक परिचय मेळाव्याचे उद्घाटन उद्योजक सतीश गवळी यांच्या हस्ते करण्यात आले. उद्योजक राहुल म्हस्के यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या कार्यक्रमासाठी जगन्नाथ गाडेकर, राहुल म्हस्के, दिलीप दारुणकर, विनोद राऊत, जयंत इंगळे, विष्णू सिदलबे, संताजी विचार मंचचे अध्यक्ष सोमनाथ देवकर, विजय काळे, अरविंद दारुणकर, निलेश दारुणकर, संतोष मेहेत्रे, मिलिंद क्षीरसागर, श्रीकांत सोनटक्के, संदीप शिंदे, बाळकृष्ण दारुणकर, दिनकर घोडके, राजू म्हस्के, नितीन फल्ले, प्रीतम शेंदुरकर, बाळासाहेब शिंदे आदी उपस्थित होते.

दीपप्रज्वलन करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. प्रारंभी संताजी महाराजांची प्रतिमा पूजन करुन आरती करण्यात आली. जय श्रीरामचा नारा देत मान्यवरांचा भगवान श्रीरामची मुर्ती भेट देऊन सन्मान करण्यात आला. विधानसभा निवडणुकीत निवडून आलेल्या तेली समाजातील लोकप्रतिनिधींचा अभिनंदनचा ठराव घेण्यात आला.

विजय काळे म्हणाले की, दरवर्षी वधू-वर मेळाव्याच्या माध्यमातून समाज एकत्र येत आहे. या मेळाव्याच्या माध्यमातून समाजातील अनेक मुला-मुलींचे लग्न जमले असून, त्यांचा सुखी संसार सुरु आहे. निस्वार्थ व सामाजिक भावनेने मुला-मुलींचे लग्न जमविण्याचे कार्य या संस्थांच्या माध्यमातून होत आहे. या उपक्रमाला समाजाचा उत्तमपणे प्रतिसाद मिळत आहे. लग्न जुळण्यास समाजासाठी एक चांगले व्यासपीठ निर्माण झाले असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रा. श्रीकांत सोनटक्के म्हणाले की, प्रत्येक समाजात मुले-मुली असून देखील योग्य वधू-वर मिळत नाही. एकमेकांच्या भेटीगाठी कमी झाल्याने या समस्या येत आहे. मात्र त्यावर पर्याय म्हणून समाजाचा वधू-वर मेळावा उपयुक्त ठरत आहे. या मेळाव्यातून मुला-मुलींच्या जीवनाच्या रेशीमगाठी बांधले जात असून, समाजातील व्यक्ती हे कार्य समाजकार्याच्या भावनेने करत असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. दुपारच्या सत्रानंतर वधू-वर मुला, मुलींनी प्रत्यक्ष व्यासपीठावर येऊन स्वत:चा परिचय करुन दिला.

आलेल्या पालकांना निशुल्क वधू-वरांची माहिती असलेली पुस्तिका देण्यात आली.

# नगर शहरात ९ जानेवारीला सर्वजातीय वधू-वर मेळावा

नगर – शहरात राज्यस्तरीय सर्व जातीय वधू-वर मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. ९ जानेवारी रोजी सावेडी येथील कोहिनूर मंगल कार्यालयात होणाऱ्या सावित्री ज्योती महोत्सवात वधू-वर मेळावा होणार असून, यामध्ये राज्यातील सर्व समाजाचे वधू-वर व त्यांचे पालक उपस्थित राहणार आहेत. या मेळाव्यात सहभागी होण्याचे आवाहन ॲड. महेश शिंदे, पोपट बनकर, अनिल साळवे, शिवाजी नवले, रावसाहेब काळे पाटील, अशोक कासार, भीमराव उल्हारे, सुनील मतकर, गणेश बनकर, सचिन गुलदगड, शेखर होले, ॲड. सुनील तोडकर, विजय भालसिंग, जालिंदर बोरुडे, राजेंद्र कर्डिले, विशाल गर्जे, अण्णासाहेब पाटोळे आदींनी केले आहे.

आधुनिक काळात सर्वच समाजामध्ये प्रत्यक्ष गाठीभेटींचे प्रमाण कमी झाल्याने मुला मुलींचे विवाह जुळविण्यास अडचणी येत आहेत. तसेच कमी शिक्षण झालेल्या मुले-मुली, शेतकऱ्यांची मुले, गरीब कुटुंबातील, घटस्फोटीत मुले-मुली, आपत्य, विना आपत्य यांचे योग्य स्थळ मिळत नसल्याने विवाह थांबले आहेत. या मेळाव्यातून विवाह जुळविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

जय युवा अकॅडमी, जनवार्ता, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बहुउद्देशीय संस्था, छावा संघटना आदींच्या सहकार्याने वधू-वर मेळावा होणार आहे. यामध्ये सहभागी होण्यासाठी नाव नोंदणी आवश्यक असून, माहितीसाठी ९००४७२२३३०, ९९२१८१००९६ व ९६५७५११८६९.


## सुपा येथे १९ डिसेंबर रोजी मोफत हृदयरोग तपासणी व चिकित्सा शिबीर

नगर – पुण्यातील रूबी हॉल क्लिनिक येथे हृदयरोगावरील अत्याधुनिक व जागतिक दर्जाच्या उपचार सुविधा उपलब्ध आहेत. राज्यातील रूग्णांना या सुविधांचा लाभ होत असतो. याशिवाय जास्तीत जास्त रूग्णांना या आरोग्य सेवेचा लाभ मिळण्यासाठी १९ डिसेंबर पारनेर तालुक्यातील सुपा येथील निरामय हॉस्पिटल येथे दुपारी १२ ते ३ यावेळेत मोफत हृदयरोग तपासणी व चिकित्सा शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात प्रसिध्द हृदयरोग तज्ज्ञ डॉक्टर्स रूग्णांची मोफत तपासणी करणार आहेत, अशी माहिती सिनियर मॅनेजर संतोष दसासे यांनी दिली.

सध्याच्या काळात हृदयविकारावर अधिक परिणाम कारक उपचार शक्य झाले आहेत. छातीत दुखणे, दम लागणे, अस्वस्थ वाटणे अशी लक्षणे असलेल्या रूग्णांनी शिबिरात आवर्जून तपासणी करून घ्यावी. शिबिरात सहभागी होणाऱ्या रूग्णांवर अँजिओप्लास्टी, अँजिओग्राफी सूट देण्यात येईल तसेच पुढील उपचारही सवलतीच्या दरात केले जाणार आहेत. नाव नोंदणी आवश्यक आहे. नोंदणीसाठी संपर्क : ७०२०४९२६५५ /७७९००९४००४.

## भिंगार येथील देवांग कोष्टी समाजाच्या अध्यक्षपदी शिवम भंडारी यांची निवड

नगर – भिंगार देवांग कोष्टी समाज अध्यक्षपदी शिवम प्रभाकर भंडारी यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. नुकतीच भिंगारला देवांग कोष्टी समाजाची सर्वसाधारण सभा पार पडली. यामध्ये भंडारी यांच्या नियुक्तीची घोषणा करण्यात आली. तसेच नवीन मंदिराच्या कामाची सुरुवात करण्यात आली असून, मंदिराच्या कामासाठी मदत करण्याचे आवाहन समाजाच्या वतीने करण्यात आले आहे.



भिंगार मधील देवांग कोष्टी समाजातील ज्येष्ठ व्यक्तींच्या प्रमुख उपस्थितीमध्ये ही बैठक घेण्यात आली. यावेळी अनिल सोळसे, संदिप टेके, विजयकुमार भंडारी, शिवकुमार वाघुंबरे, प्रविण खारपे, सुनील विधाते, माऊली डिगे, राजू कुरकुटे, उमाकांत अस्मार, गजानन भंडारे, रमेश बोंदर्डे, अच्युत चिणके, दिपक चिणके, राहुल लिपारे, शंकर कृष्णे, शंकर खर्पे, उमाकांत आस्मार, बाळकृष्ण कुमठेकर, कल्याण कांबळे, नवनाथ सगम, ज्ञानेश्वर विधाते, गुरसाळी भाऊ आदी उपस्थित होते.

शिवम भंडारी यांचे विविध क्षेत्रात सामाजिक कार्य सुरु असून, त्यांचे समाजासाठी असलेले योगदान व कार्य लक्षात घेऊन त्यांची अध्यक्षपदी फेरनिवड करण्यात आली आहे. भंडारी यांनी येणाऱ्या काळात समाजाच्या विकासासाठी प्रयत्नशील राहून समाजाच्या उज्वल भवितव्यासाठी विविध उपक्रम राबविण्याचा मानस व्यक्त केला.

# पंतप्रधान सहायता निधीची रक्कम वाढवा, रूग्णसंख्या अमर्याद करा

**खासदार नीलेश लंके यांची लोकसभेत मागणी**

नगर – पंतप्रधान राष्ट्रीय सहायता निधी अंतर्गत रूग्णांना देण्यात येणारी ३ लाख ही कमाल रक्कम वाढविण्यात यावी तसेच एका सदस्याची ३५ रूग्णांची मर्यादा हटवून ती अमर्याद करण्याची आग्रही मागणी नगरचे खासदार नीलेश लंके यांनी सोमवारी लोकसभेत केली.

लोकसभेत सभागृहाचे लक्ष वेधताना खा. लंके म्हणाले, पंतप्रधान राष्ट्रीय सहायता निधी अंतर्गत देण्यात येणारी कमाल रक्कम तीन लाख रूपये आहे. आजाराचा संपूर्ण खर्च भागविण्यासाठी ही रक्कम पुरेशी नसून ही मर्यादा वाढविण्याची गरज आहे. पंतप्रधान राष्ट्रीय सहायता निधीअंतर्गत एक वर्षात एका सदस्याला ३५ रूग्णांना मदत करता येते. ही मर्यादा योग्य नाही. ही मर्यादा काढून टाकून ती अमर्याद करण्यात यावी अशी मागणी लंके यांनी केली.




पंतप्रधान राष्ट्रीय सहायता निधी अंतर्गत रूग्णांना देण्यात येणारी ३ लाख ही कमाल रक्कम वाढविण्यात यावी व रूग्ण संख्या अमर्याद करण्याची मागणी खा. नीलेश लंके यांनी सोमवारी लोकसभेमध्ये केली.

पंतप्रधान राष्ट्रीय सहायता निधी अंतर्गत नेमण्यात आलेल्या पॅनलमध्ये रूग्णालयांची संख्या वाढविण्याची आवष्यकता आहे. ही संख्या लवकरात लवकर वाढवून एका तालुक्यात किमान एक रूग्णालय या पॅनलमध्ये घेण्याची मागणीही लंके यांनी केली.

पंतप्रधान राष्ट्रीय निधी अंतर्गत पाठविण्यात येणारे प्रस्ताव हे पोष्टाने मागविले जातात. त्यात बदल करून हे प्रस्ताव ऑनलाईन मागविण्यात यावेत जेणेकरून रूग्णाला कमी वेळेत लवकरात लवकर आर्थिक मदत मिळू शकेल असेही लंके यांनी सांगितले. या योजनेअंतर्गत एखादा विशेष बाब हा पर्याय असायला हवा. एखाद्या रूग्णाचा आजार सुचीमध्ये नसेल तर विशेष बाब या पर्यायातून त्या रूग्णाला मदत करता येईल. असेही लंके यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले.

### खा लंके यांचा कोटा ६ महिन्यात संपला

एक वर्षात एका सदस्याला ३५ रूग्णांना मदत करता येते. खा. नीलेश लंके यांनी या योजनेअंतर्गत शेकडो प्रस्ताव दाखल केले असून सहा महिन्यात त्यांचा कोटा संपला आहे. तर अनेक प्रस्ताव प्रलंबित आहे. यासंदर्भात त्यांनी संबंधित मंत्री तसेच अधिकाऱ्यांची भेट घेउन प्रलंबित रूग्णांना मदत करण्याची गळ घातली आहे. त्याच पार्श्वभुमीवर सदस्यांसाठी अमर्याद कोटा देण्याची मागणी लोकसभेमध्ये केली आहे. विधानसभेत काम करताना खा. नीलेश लंके यांनी मुख्यमंत्री सहायता निधीमार्फत राज्यात सर्वाधिक रूग्णांना मदत मिळवून दिली असून पंतप्रधान सहायता योजनेतूनही जास्तीत जास्त रूग्णांना मदत मिळवून देण्याचा त्यांचा प्रयत्न आहे.

# राज्यस्तरीय वरिष्ठ ग्रीकोरोमन कुस्ती व पहिल्या ग्रीकोरोमन महाराष्ट्र केसरीसाठी २१ डिसेंबर रोजी अहिल्यानगर शहरात जिल्हा संघ निवड चाचणी स्पर्धांचे आयोजन

नगर – येत्या जानेवारी महिन्यात वरिष्ठ ग्रीकोरोमन राज्यस्तरीय अजिंक्यपद कुस्ती स्पर्धा व राज्यात पहिल्यांदाच होणाऱ्या ग्रीकोरोमन महाराष्ट्र केसरी लढत कुस्ती स्पर्धांचे आयोजन वर्धा येथे होणार आहे. या स्पर्धांसाठी अहिल्यानगर जिल्हा संघाची निवड चाचणी स्पर्धेचे आयोजन २१ डिसेंबर रोजी करण्यात आले आहे. ही निवड चाचणीस स्पर्धा पाइपलाइन रोडवरील गजराज फॅक्टरी जवळ, भिस्तबाग रोड येथील संभाजी राजे कुस्ती संकुल येथे सकाळी १० वाजता सुरवात होणार आहे, अशी माहिती महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे अहिल्यानगर जिल्हा सचिव प्रा.डॉ.पै. संतोष भुजबळ यांनी दिली.

निवड चाचणी स्पर्धेबाबत अधिक माहिती देताना महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे अहिल्यानगर जिल्हा वरिष्ठ उपाध्यक्ष महाराष्ट्र केसरी पै. अशोक शिर्के म्हणाले, महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे अहिल्यानगरचे जिल्हाध्यक्ष आ.संग्राम जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली दोन्ही स्पर्धांसाठीच्या संघाच्या निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व कुस्तीगीर, वस्ताद, व कुस्ती मार्गदर्शक व पालकांनी या निवड चाचणी स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन केले आहे.

निवड चाचणी स्पर्धेच्या नियमांची माहिती देताना संघटनेचे उपाध्यक्ष पै.अर्जुन शेळके म्हणाले, दोन्ही स्पर्धांसाठी महाराष्ट्र कुस्तीगीर संघांच्या नियमानुसार ठरलेल्या वजन गटांमध्ये ही निवड चाचणी होणार आहे. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या कुस्तीगीराचा जन्म २००४ किंवा त्या पूर्वीचा असावा, सन २००५ व ०६ मध्ये जन्मलेल्या कुस्तीगीरास मेडिकल सर्टिफिकेट व पालक संमती पत्र द्यावे लागेल. वयाचा पुरावा म्हणून आधार कार्ड किंवा पासपोर्ट ग्राह्य धरण्यात येईल. रेल्वे आणि आर्मी सर्विसेस मध्ये नोकरीस असलेल्या कुस्तीगीरास सदर निवड चाचणी मध्ये सहभाग घेता येणार नाही (वरिष्ठ पुरुष कुस्तीगीर यांच्यासाठी). राज्य अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेतील फ्रीस्टाइल विभागातील पदक विजेत्या कुस्तीगीरास सदर वरिष्ठ ग्रीकोरोमन जिल्हा निवड चाचणीमध्ये सहभाग घेता येणार नाही.

या वरिष्ठ ग्रीकोरोमन राज्यस्तरीय अजिंक्यपद कुस्ती स्पर्धा व राज्यात पहिल्यांदाच होणाऱ्या ग्रीकोरोमन महाराष्ट्र केसरी लढत कुस्ती स्पर्धांच्या निवड चाचणी स्पर्धांमध्ये कुस्तीगिरांनी सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाचे सह सचिव पै. प्रवीण घुले यांनी केले आहे.

# जपनीतकौर ठकरालचे जागतिक स्पर्धेत यश



श्रीरामपूर - येथील ॲड. रावसाहेब शिंदे प्रतिष्ठान संचलित विद्यानिकेतन ॲकेडमीमधील इयत्ता आठवी या वर्गात शिक्षण घेत असलेली विद्यार्थिनी जपनीतकौर रणजीतसिंह ठकराल हिने वर्ल्ड हॅण्डरायटींग स्पर्धेत जागतिक स्तरावरील हस्ताक्षर स्पर्धेत जगामध्ये द्वितीय क्रमांक पटकाविला आहे. द्वितीय क्रमांक पटकाविल्याची माहिती विद्यानिकेतनच्या प्राचार्या वर्षा धामोरे यांनी दिली.

या यशाचे कौतूक म्हणून तिच्या हॅण्डरायटींगचा नमूना वर्ल्ड हॅण्डरायटींग कॉन्स्टेटच्या गुगल होमपेजवर वर्षभर झळकला जाणार आहे. या शिवाय जपनीतकौर रणजितसिंह ठकराल हिच्या हॅण्डरायटींगचे नमूने फोटोसह लक्सर कंपनीत व दिल्लीच्या मेट्रोमध्ये २५ होर्डीगवर झळकले जाणार आहेत. ही ठकराल व विद्यानिकेतन ॲकेडमीची भारत देशासाठी अभिमानास्पद बाब आहे.

जपनीतकौर ही श्रीरामपूर शहरातील ठकराल एजन्सी होलसेल कॉस्मेटीक विक्रेते जसपालसिंह ठकराल यांची कन्या आहे. तिने वडीलांसह परिवाराचे व विद्यानिकेतनच्या लौकीकात या यशाची भर टाकली आहे. जपनीतकौर ही व्यापारी रणजितसिंह ठकराल यांची कन्या असून कॉस्मेटीक व्यापारी ठकराल एजन्सीचे चालक जसपालसिंग ठकराल यांची नात असून तिला विद्यानिकेतनच्या प्राचार्या वर्षा धामोरे, वर्गशिक्षक विजय रणदिवे व आई सरबदीपकौर व वडील रणजितसिंह ठकराल यांचे मार्गदर्शन लाभले.



मनपा पतसंस्थेच्या चेअरमनपदी बलराज गायकवाड तर व्हाईस चेअरमनपदी बाळासाहेब गंगेकर यांची निवड झाल्यानंतर त्यांचा सत्कार करण्यात आला. (छाया – लहू दळवी)

# मनपा पतसंस्थेच्या चेअरमनपदी बलराज गायकवाड; व्हाईस चेअरमनपदी बाळासाहेब गंगेकर यांची निवड

नगर – अहिल्यानगर मनपा सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी बलराज गायकवाड यांची निवड झाली असून त्यांच्या नावाची सूचना संचालक सतीश ताठे यांनी मांडली तर अनुमोदन संचालक शेखर देशपांडे यांनी दिले तर व्हाईस चेअरमन पदी बाळासाहेब गंगेकर यांची निवड झाली असून त्यांच्या नावाची सूचना संचालक किशोर कानडे यांनी मांडली तर अनुमोदन संचालक कैलास चावरे यांनी दिले. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून जिल्हा उपनिबंधक कार्यालयातील अधिकारी एम.एस. ठोकळ यांनी काम पाहिले. चेअरमन व्हाईस चेअरमन पदासाठी दोघांचे एकमेव अर्ज आले असून संचालक मंडळाने एकमताने निवड केली. यावेळी माजी चेअरमन बाळासाहेब पवार तर माजी व्हाईस चेअरमन सोमनाथ सोनवणे यांनी नूतन चेअरमन व व्हाईस चेअरमन यांचा सत्कार केला. यावेळी ज्येष्ठ संचालक बाबासाहेब मुदगल, जितेंद्र सारसर, बाबासाहेब मुदगल, सतीश ताठे, किशोर कानडे, श्रीधर देशपांडे, अजय कांबळे, गुलाब गाडे, कैलास चावरे, विकास गीते, विजय कोतकर, संचालिका प्रमिला पवार, उषा वैराळ, कार्यलक्ष्मी संचालक आनंद तिवारी आदींसह सभासद उपस्थित होते

लराज गायकवाड म्हणाले की, मनपा कर्मचारी पतसंस्था नेहमीच सभासदाचे हित जोपासण्याचे काम करत असून त्यांच्या अडीअडचणीच्या काळामध्ये साथ देण्याचे काम करत असते, माझ्यासारख्या सर्वसामान्य कार्यकर्त्याला मनपा कर्मचाऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी संधी मिळाले आहे या माध्यमातून सभासदाच्या हिताचे निर्णय घेतले जातील असे ते म्हणाले

व्बाळासाहेब गंगेकर म्हणाले की मनपा कर्मचारी पतसंस्थेला शंभर वर्षाची परंपरा असून आम्ही सर्व संचालक मंडळ एकमताने निर्णय घेत यशाच्या शिखराकडे वाटचाल करीत आहे असे ते म्हणाले.

# शाळाच विद्यार्थ्यांचे मुख्य संस्कार केंद्र

## डॉक्टर सुनिल गंधे यांचे प्रतिपादन



केडगांव येथील भाग्योदय माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात व्यक्तिमत्व विकासावर व्याख्यान देताना डॉ. सुनिल गंधे.

## भाग्योदय विद्यालयात व्यक्तिमत्व विकासावर व्याख्यान

नगर – आजच्या काळात शालेय अवस्थेपासूनच जर विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन व शिस्त मिळाली तर भविष्यात विद्यार्थी कधीही बिघडू शकत नाही. शाळा आहे त्याचं मुख्य संस्कार केंद्र आहे. शालेय अवस्थेत विद्यार्थ्यांनी वेळ, नियम, शिस्त, आहार दिनचर्या, अभ्यास या पंचसूत्रीचा अभ्यास करून आपले व्यक्तिमत्व घडवला पाहिजे, वर्षभर राबवणाऱ्या विविध शालेय उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला पाहिजे, की ज्यामुळे भविष्यात येणाऱ्या अनेक परीक्षा, अनेक संकट, समस्या यावर विद्यार्थी मात करू शकतो, असे प्रतिपादन लोकनियुक्त सरपंच डॉ.सुनिल गंधे यांनी कले.

केडगांव येथील भाग्योदय माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात व्यक्तिमत्व विकासावर प्राचार्य ज्ञानदेव बेरड यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. सुनील गंधे यांचे व्याख्यान आयोजित केले होते. यावेळी ते बोलत होते. यावेळी प्राचार्य ज्ञानदेव बेरड यांच्यासह शिक्षक उपस्थित होते.

पुढे बोलताना डॉ.गंधे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी शालेय जीवनामध्ये आपल्या आरोग्याची काळजी घेतली पाहिजे, विद्यार्थ्यांमध्ये जिज्ञासावृत्ती वाढीस लागली पाहिजे. विद्यार्थ्यांनी प्रत्येक घटनेबद्दल विषयाबद्दल शिक्षकांना प्रश्न विचारले पाहिजेत, त्यातून त्यांची संशोधनवृत्ती वाढीस लागते, विद्यार्थ्यांनी शाळेत येणार आपला डबा त्याच्यामध्ये असणारा आहार यामध्ये बेकरी प्रॉडक्ट आणि फास्ट फूड यांचा समावेश नसावा, की ज्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये हिमोग्लोबिनची कमतरता जाणवते. विद्यार्थी अशक्त बनतात विद्यार्थ्यांचा शारीरिक विकास होत नाही, परिणामी विद्यार्थी अभ्यासामध्ये मागे पडतात. त्यासाठी विद्यार्थ्यांनी आपल्या आहारामध्ये आपल्या भारतीय परिसरातील मिळणारा भाजीपाला कडधान्य याचा जास्तीत जास्त वापर करावा. तसेच विद्यार्थ्यांनी आहारात शाकाहाराचा वापर करावा, त्यामुळे विद्यार्थ्यांची बुद्धी तल्लक, तेज आणि शार्प बनते. विद्यार्थ्यांना आळस येत नाही व अभ्यासात विद्यार्थी हुशार होतात. विद्यार्थ्यांनी आपल्या दिनचर्यामध्ये सकाळी लवकर उठावे, कोमट पाणी प्यावे दररोज न चुकता नाश्ता करावा आई-वडिलांचे दर्शन घ्यावे. विद्यालयात आल्यावर आपल्या विद्यालयाचे दर्शन घ्यावे, अशा विद्यार्थ्यांना भविष्यात कधीही काही कमी पडणार नाही. असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राध्यापक एकनाथ होले यांनी विद्यालयांमध्ये विविध विषयावर विविध तज्ञ व मार्गदर्शकांचे व्याख्यान आयोजित केले जातात. ज्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये सुजलशीलता जिज्ञाशीवृत्ती आणि त्याचे व्यक्तिमत्त्व सर्वगुण संपन्न बनेल. येणाऱ्या स्पर्धा परीक्षेमध्ये विद्यार्थ्यांना सर्व परीक्षेचा अनुभव मिळावा, हा हेतू विद्यालयाचा असतो. डॉ. सुनील गंधे हे अनेक आंतरराष्ट्रीय देशात फिरून त्याचा अनुभव घेऊन आले. तसेच अनेक सर्व रोग निदान शिबिर आयोजित केलेले आहेत सामुदायिक विवाह सोहळे आयोजित करून प्राणायाम व योग शिबिर सुद्धा ते भरवतात. त्यामुळे विद्यार्थ्यांना त्याकडून प्रेरणा मिळावी, म्हणून त्यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले.

प्राचार्य ज्ञानदेव बेरड यांनी प्रमुख पाहुण्यांचा सत्कार करून विद्यालयांमध्ये वर्षभर व्यक्तिमत्व विकासावर तसेच अनेक सहशालेय कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी राबवले जातात. इयत्ता दहावी आणि बारावीच्या परीक्षा जवळ आल्यामुळे विद्यार्थ्यांच्या बोर्डपरीक्षानंतर विद्यार्थ्यांना अनेक स्पर्धा परीक्षा द्याव्या लागतात. त्यासाठी भाग्योदय विद्यालय विद्यालयांमध्ये इयत्ता दहावी बारावी विद्यार्थ्यांकरता स्पर्धा परीक्षांचा सराव करून घेतला जातो. तसेच अनेक स्पर्धा परीक्षा अनेक स्पर्धा परीक्षा पुस्तकांचं ग्रंथालयामध्ये आणून विद्यार्थ्यांनी या स्पर्धा परीक्षांचे वाचन करून वाचन संस्कृती वाढीस लावावी व विद्यार्थ्यांनी मोबाईलचा कमीत कमी वापर करावा.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक कोतकर बाबासाहेब, सोपानराव तोडमल, साहेबराव कार्ले, कदम गोविंद, गोरक्ष कांडेकर, दत्तात्रय पांडुळे, धनंजय बारगळ, आदिनाथ दुबे, संतोष काकडे तसेच शिक्षकेतर कर्मचारी गायकवाड गणेश, बाळासाहेब कावरे, सुधाकर गायकवाड आदींनी परिश्रम घेतले.

# आळंदी येथे २९ डिसेंबर रोजी राज्यस्तरीय पर्यावरण संमेलन

श्रीरामपूर – निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळ यांच्यावतीने २९ डिसेंबर रोजी आळंदी (देवाची) येथे आठवे राज्यस्तरीय पर्यावरण संमेलन आयोजित केल्याची माहिती मंडळाचे अध्यक्ष प्रमोद मोरे यांनी दिली.

वृक्षमित्र स्वर्गीय आबासाहेब मोरे यांनी स्थापन केलेल्या आणि पद्मभूषण अण्णा हजारे यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रभर कार्यरत असलेल्या निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळाचे आठवे राज्यस्तरीय पर्यावरण संमेलन देवाची आळंदी येथे देविदास धर्मशाळेत २९ डिसेंबर रोजी आयोजित केले आहे. संमेलनाच्या पहिल्या सत्रात संमेलनाचे उदघाटन आळंदी देवस्थानचे प्रमुख विश्वस्त ॲड. राजेंद्र उमाप यांच्या हस्ते होणार असून ज्येष्ठ वनस्पती शास्त्रज्ञ प्रा. श्रीधर महाजन हे संमेलनाध्यक्ष म्हणून उपस्थित राहणार आहेत तर प्रमुख पाहुणे म्हणून सारथी संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक अशोक काकडे, पर्यावरण तज्ज्ञ व निवृत्त जेष्ठ शास्त्रज्ञ डॉ. प्रमोद मोघे, डब्ल्यू ई चांगुलपणाच्या चळवळीचे संस्थापक राज देशमुख, इतिहास अभ्यासक संदीप तापकीर हे उपस्थित राहणार आहेत.

या संमेलनाच्या समारोप समारंभ प्रसंगी पुणे मनपाचे माजी सहाय्यक आरोग्य अधिकारी ॲड. प्रभाकर तावरे व आळंदी देवस्थानचे अध्यक्ष निरंजनशास्त्री कोठेकर यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. समारोपापूर्वीच्या दुपारच्या सत्रात क्षेत्रभेटीचे आयोजन केलेले आहे. या संमेलनामध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन सचिव वनश्रीताई मोरे-गुणवरे व मंडळाचे पदाधिकारी छायाताई रजपूत, प्रसिद्धीप्रमुख महेश पाडेकर, लतिका पवार, तुकाराम अडसूळ व संमेलन संयोजन समितीने केले आहे. या संमेलनाचे सूत्रसंचालन सूत्रसंचालक धीरज वाटेकर हे करणार आहेत.

या संमेलनाच्या नाव नोंदणीसाठी डॉ. शरद दुधाट, ९८३४१३२१३८ यांच्याशी संपर्क साधावा.

# योग्य वेळी घेतलेले योग्य निर्णय जीवनाचा कायापालट करतात

## डॉ. मेहेरनोश मेहता यांचे प्रतिपादन; अशोकभाऊ फिरोदियाच्या स्नेहसंमेलनात सतयुग से कलियुगातील नारी शक्तीच्या सामर्थ्याचे दर्शन





माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागाच्या स्नेहसंमेलनाचे उद्घाटन सरस्वतीपूजन करून दीपप्रज्वलनाने उद्घाटन करताना डॉ. मेहेरनोश मेहता पहिल्या छायाचित्रात तर सांस्कृतिक कार्यक्रम सादर करताना विद्यार्थी दुसऱ्या छायाचित्रात दिसत आहेत.

नगर – जीवनात वाचन महत्त्वाचे आहे. वाचनाने प्रेरणा व यशाचा मार्ग सापडतो. सध्याची पिढी वाचनापासून दुरावल्याने भरकटत आहे. शिक्षणाबरोबरच कौशल्यक्षम शिक्षणाची गरज निर्माण झाली आहे. त्या दिशेने जाण्याची गरज आहे. कठोर परिश्रम व शिक्षणाने मिळालेले ज्ञान जीवनाच्या यशाकडे घेऊन जातात. योग्य वेळी घेतलेले योग्य निर्णय जीवनाचा कायापालट करतात. दहावी नंतरचे दोन–तीन वर्ष जीवनाची दिशा बदलून टाकतात. त्यासाठी योग्य निर्णय घेण्याचे त्यांनी विद्यार्थ्यांना आवाहन केले. तर या शाळेत इयत्ता अकरावीचे शिक्षण घेताना महाविद्यालयीन जीवनातील आठवणींना उजाळा मिळाल्याचे डॉ. मेहेरनोश मेहता यांनी सांगितले.

अ.ए.सो.च्या अशोकभाऊ फिरोदिया इंग्लिश मीडियम स्कूलच्या दोन दिवसीय स्नेहसंमेलनात सत्ययुग, त्रेतायुग, द्वापारयुग आणि कलियुगातील स्त्री शक्तीच्या सामर्थ्याचे दर्शन सांस्कृतिक कार्यक्रमातून घडविण्यात आले. पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागाने सत्ययुग आणि त्रेतायुग, तर माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी द्वापारयुग आणि कलियुगातील नारी शक्तीचे विविध रूप उलगडले. नारी सतयुग से कलियुग तक! या संकल्पनेवर शालेय विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमाने उपस्थितांची मने जिंकली.

माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागाच्या स्नेहसंमेलनाचे उद्घाटन आय.एम.एस. सीडीआर महाविद्यालयाचे संचालक डॉ. मेहेरनोश मेहता यांच्या हस्ते सरस्वतीपूजन करून दीपप्रज्वलनाने झाले. संस्थेच्या डॉ.आर.बी. मोने कला मंदिरात झालेल्या कार्यक्रमाप्रसंगी संस्थेच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया, खजिनदार प्रकाश गांधी, सल्लागार भूषण भंडारी, विश्वस्त सुनंदा भालेराव, आशाताई फिरोदिया, पुष्पा फिरोदिया, सुनीता भुषा, विद्यालयाचे प्राचार्या प्रभाकर भाबड, उपप्राचार्या कविता सुरतवाला, उच्च माध्यमिक विभाग प्रमुख अश्विनी रायजादे, माध्यमिक विभाग प्रमुख वैशाली वाघ, प्राथमिक विभाग प्रमुख रेखा शर्मा, पूर्व प्राथमिक विभाग प्रमुख कांचन कुमार, विद्यार्थी प्रतिनिधी आर्यन दुबेपाटील, विद्यार्थिनी प्रतिनिधी शाल्मली तरवडे आदींसह सर्व अध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

प्रास्ताविकात छायाताई फिरोदिया म्हणाल्या की, शाळेचा स्नेहसंमेलन हा विद्यार्थ्यांसाठी जिव्हाळ्याचा विषय असतो. या आठवणी जीवनभर मनात कोरल्या जातात. विविध क्षेत्रात यश मिळवताना पाठीवरती मिळालेली कौतुकाची थाप प्रेरणा देत राहते. शालेय जीवन आयुष्याचा अमूल्य ठेवा असून, विद्यार्थ्यांनी जबाबदारीने वागावे. तुमच्या जीवनाचे तुम्हीच शिल्पकार असल्याचे सांगून, त्यांनी मुलांच्या आवडीनिवडीनुसार शिक्षकांच्या मार्गदर्शनाने भविष्यातील वाटा निवडण्यासाठी प्रोत्साहन देण्याचे पालकांना आवाहन केले.

प्रारंभी प्राथमिक विभागाच्या संगीत अध्यापिका सुवर्णा मलमकर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी बहारदार स्वागत गीत सादर करून पाहुण्यांचे स्वागत केले. मोहित रंगलानी व राजनंदिनी त्रिंबके या विद्यार्थ्यांनी प्रमुख पाहुणे डॉ. मेहेरनोश मेहता यांच्या मुलाखतीद्वारे यशाचा कानमंत्र जाणून घेतला. तर आय.एम.एस. सीडीआर महाविद्यालयातील विविध शिक्षणाच्या संधी व करियरच्या वाटेबद्दल माहिती जाणून घेतली. ॲडमिनिस्ट्रेटिव्हची जबाबदारी सांभाळताना निर्माण होणारे प्रश्न, दैनंदिन दिनचर्या, कामाचे नियोजन आदी प्रश्नांवर डॉ. मेहता यांना विद्यार्थ्यांनी बोलते केले.

शाळेच्यावतीने डॉ. मेहता यांचा सत्कार करण्यात आला. पाहुण्यांच्या हस्ते शैक्षणिक वर्ष २०२३–२४ मध्ये शाळांतर्गत विविध स्पर्धा परीक्षांमध्ये यश प्राप्त केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिक देण्यात आली. यादी वाचन जान्हवी फुलसौंदर व स्वराली शिंदे यांनी केले.

गणेश वंदनेने कार्यक्रमाचा प्रारंभ झाला. स्त्री निर्मित ब्रह्मा, विष्णू, महेशाचे सादरीकरण नमस्तुते परमशक्तीद्वारे दाखविण्यात आले. तर शक्ती पिठाचे दर्शन घडवित महिषासुर मर्दिनीचे रुपाचे साक्षात्कार विद्यार्थ्यांनी घडविले. चलो बुलावा आया है!.... या गीताने वातावरण भक्तीमय बनले होते. कंसाचा अत्याचार..., देवकी यशोदा यांना अपत्य प्राप्तीतून झालेला श्रीकृष्ण जन्म.... श्रीकृष्ण लीलेतून द्वापारयुगात विद्यार्थ्यांनी प्रेक्षकांना घेऊन गेले. गांधारी, कुंती, द्रोपदी यांचे पात्र साकारण्यात आले होते. या कार्यक्रमातून भक्तीची ज्योत पेटवण्यात आली. तर कलयुगातील स्त्री शक्तीचे दर्शन घडविताना संत मीराबाई, राणी लक्ष्मीबाई, अहिल्यादेवी होळकर, राजमाता जिजाऊ पासून ते सिंधूताई सपकाळ पर्यंतच्या कर्तृत्ववान महिलांचे दर्शन सांस्कृतिक कार्यक्रमाद्वारे घडविण्यात आले. सत्ययुगापासून ते कलियुग पर्यंत स्त्रीच्या सन्मानार्थ सांस्कृतिक कार्यक्रम रंगला होता.

सूत्रसंचालन तनिष्का नांगरे व सारा शेख या विद्यार्थ्यांनी केले. तर सांस्कृतिक कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रावणी देशमुख आणि ओवी सातपुते यांनी केले. आभार उत्कर्ष देशमुख व इरा कुलकर्णी यांनी मानले. वंदे मातरम ने कार्यक्रमाची सांगता झाली.

# खंडेलवाल वैश्य धाम रथयात्रेचे अहिल्यानगरमध्ये जल्लोषात स्वागत





राजस्थानातून खंडेला धाम येथून खंडेलवाल समाजाच्या कुलदेवतेची रथयात्रेचे अहिल्यानगर येथे आगमन झाले असता खंडेलवाल समाजाच्या वतीने मोठ्या जल्लोषात स्वागत करण्यात आले.

नगर – राजस्थानातून खंडेला धाम येथून खंडेलवाल समाजाच्या कुलदेवतेची रथयात्रा अहिल्यानगर येथे आगमन झाली असता अहिल्यानगर खंडेलवाल समाजाच्या वतीने रथयात्रेचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. तसेच रथयात्रा बरोबर खंडेला वैश्य धाम ट्रस्टचे विश्वस्त पुरुषोत्तम गुप्ता यांचा सत्कार खंडेलवाल समाज कल्याणकारी संघा तर्फे करण्यात आला. याप्रसंगी कार्यकारिणी अध्यक्ष राहुल धोकरिया, उपाध्यक्ष निलेश मेहेरवाल, सचिव पराग धोकरिया, खजिनदार प्रफुल्ल झालानी, सहसचिव अमोल राजोरिया, कार्यकारिणी सदस्य प्रवीण केदावत, निलेश रावत, प्रतीक कुलवाल, अमित धोकरीया, अनुप बंब, दिपक घीया आदींसह खंडेलवाल समाज बांधव व भगिनी उपस्थित होते.

खंडेला धाम तिर्थक्षेत्र येथून आलेल्या रथयात्रेचे अहिल्यानगर येथील खंडेलवाल समाजाने स्वागत केले. यात्रेची सुरुवात हॉटेल रुचिरा, प्रोफेसर चौक येथून करण्यात आली. यावेळी किशोर व राजेंद्र धोकरिया परीवार यांच्याकडून महिला व बंधूंचे चहापानाने स्वागत केले. या नंतर ही यात्रेचा वाजत गाजत खंडेलवाल सांस्कृतिक भवन येथे सांगता करण्यात आली. खंडेलवाल भवन येथे दर्शनासाठी गर्दी केली होती.

# महिलांनी पिंक ई-रिक्षा योजनेच्या लाभासाठी अर्ज करण्याचे आवाहन

नगर – गरजू महिलां व मुलींना रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यासाठी पिंक (गुलाबी) ई-रिक्षा योजना राबविण्यास शासनाने मान्यता दिली आहे. योजने अंतर्गत महिलांना रिक्षा खरेदीसाठी अर्थसहाय्य आणि चालविण्यासाठी इतर सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. जिल्ह्यातील महिलांनी या योजनेच्या लाभासाठी जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालय, प्लॉट क्र.४/५/३, जिव्हाळा हाऊस, खोडदे यांची इमारत, वंदे मातरम कॉलनी, कल्याण रोड, अहिल्यानगर येथे अर्ज सादर करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी केले आहे.


## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्टात नमुद केलेली मिळकत विद्यमान मालक १) **सतीश शामराव वारुळे,** रा. शिवगंगा रोहौसिंग, चिपाडे मळा, सारसनगर, अहमदनगर, २) **महेश कांतीलाल शेडाळे,** रा.मु. पो.जांब, ता.जि.अहमदनगर यांचे मालकी वहिवाटीची आहे. सदर मिळकतीचे विक्री करण्याचा करार करुन आमचे अशिलांबरोबर कायमखुष खरेदी देण्यांचे ठरविले आहे. तसेच सदरची मिळकत निर्वेध, निजोखमी असल्या बाबत आमचे अशिलास विश्वास व भरोसा दिलेला आहे.

परंतु कोणाचीही तक्रार राहु नये म्हणून या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की सदर मिळकतीबाबत कोणाचेही कोणत्याही **प्रकारे चालु वाद, मालकी हक्क, हितसंबंध, ताबा, मनाई, दावा, लिज, गहाण, कर्ज, दान, बक्षिस, पोटगी हक्क, सोसायटी राईटस, रद्दलेख, साठेखत, खरेदीखत कोणतेही हक्क व अधिकार व हितसंबंध असल्यांस त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन ७ (सात) दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्यावर संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकत खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिले आहे असे समजण्यांत येईल.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन** - जिल्हा तुकडी अहमदनगर पो. तु. ता. नगर पैकी अहमदनगर जिल्हापरिषद हद्दीतील मौजे **भिंगार** येथील मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.

| स.नं. | प्लॉट नं. | चौ. मी. |
| --- | --- | --- |
| २५० /१क | १७ | १५६.०० |

हा संपुर्ण प्लॉट व त्यावरील असलेले ग्राऊंड फ्लोअरचे बांधकाम क्षेत्र ९६.३३ चौ. मी. व फर्स्ट फ्लोअरचे बांधकाम क्षेत्र ४९.९४ चौ. मी. असे एकुण बांधकामाचे क्षेत्र १४६.२७ चौ.मी. ही संपुर्ण बांधकामासह मिळकत.

**यांसी चतु:सिमा :**

पुर्वेस – रस्ता
दक्षिणेस – प्लॉट नं. १६
पश्चिमेस – प्लॉट नं. ११
उत्तरेस – प्लॉट नं. १८

दि. १७/१२/२०२४
अहमदनगर.

**ॲड. मोहसीन इलियास शेख**
शॉप नं. १ आणि २, कस्तुरी प्लाझा,
कलेक्टर ऑफिस जवळ, डावरे गल्ली,
अहमदनगर. मो. ८०८७७७२४२८

## फंडू एसएमएस

घडी घडी सेल्फी लेने वाली
लडकियों के मोबाईल
कुछ टाईम बाद खुद ही
बोलते हैं... चलो मुंह
बनाओ, सेल्फी लेनी है!

एक बार याद करके तो
देखो... एक बार पुकार
के, कॉल करके दो देखो,
अगर हम ना आए तो समझ
लेना... हम सो गए हैं और
फोन सायलेंट पर है!

अल्फाज तय
करते है फैसले
किरदारों के...
उतरना दिल में है
या दिल से
उतरना है...

# नकारात्मक विचार येतात...



मी २० वर्षांचा तरूण आहे. शालेय जीवनापासूनच मी अभ्यासात हुशार आहे. पण सध्या माझं अभ्यासावरचं लक्ष उडालं आहे. मनात सतत नकारात्मक विचार येतात. आयुष्यात काहीच करू शकणार नाही, असं सतत वाटत राहतं. सगळं सोडून दूर कुठे तरी जावं, असं वाटू लागलं आहे. मी काय करू?

**उत्तर:** मित्रा, अभ्यासावरचं लक्ष उडण्यामागचं कारण तू स्पष्ट केलेलं नाही. तुला अपयश आलं आहे का? असं असेल तर यामुळे घाबरून जाऊनकोस. आयुष्यात कसोटीचे प्रसंग येत राहतात. त्याला पर्याय नाही. नकारात्मकता दूर ठेवण्याचा प्रयत्न कर. अभ्यासाकडे लक्ष दे.

**लाईफ गुरू**

प्रश्नाच्या मुळाशी जाण्यासाठी समुपदेशकाची मदत घे. आयुष्यात कधी कधी नैराश्याचे प्रसंग येतात. हेच प्रसंग आपल्याला सक्षम बनवत असतात, पारखत असतात. त्यामुळे मनाला कणखर बनव आणि अभ्यासात मन रमव. आवडीच्या गोष्टी कर. मित्रांसोबत थोडा वेळ घालव. यामुळे तुझ्या मनावरचं मळभ दूर होईल.



# जोश

तो मोटिव्हेशनल स्पीकर आहे. आयआयटी इंजिनिअर आहे. इतकंच नाही, तर तो गातो, गिटार वाजवतो आणि पोहतोसुद्धा. सर्वसामान्य ऑलराउंडर मुलगा हे करू शकतो. पण, जन्मत:च अपंग असलेल्या शिवम पोरवालने स्वत:च्या मेहनतीने आणि आत्मविश्वासाच्या जोरावर स्वत:चं जग निर्माण केलं .

## जग शिवमचं...

शिवम पोरवाल फोकोमेलिया सिंड्रोम हा विकार घेऊनच जन्मला. हा विकार झालेल्या व्यक्तीला हात, पाय नसतात किंवा ते कार्य करत नाहीत. त्याच्या उजव्या हाताला तीनच बोटं आहेत तर डाव्या हाताचा अंगठा पहिल्या बोटाशी जुळलेला आहे. आजही तो गुडघ्यांवर चालतो. पण परिस्थितीपुढे त्याने हार मानली नाही. जन्म झाल्यानंतर ही अवस्था बघून त्याला मारून टाकण्याचा सल्ला अनेकांनी दिला. त्याला बघण्यासाठी लोक लांबून येत असत. त्याची मस्करी करत. सहानुभूती दाखवत पण सुरूवातीपासूनच शिवमने संघर्षाची तयारी केली होती. त्याने सर्वसामान्य मुलांसारखं जगण्याचं आव्हान स्वीकारायचं ठरवलं. तो मध्य प्रदेशमधल्या माहिदपूर या छोट्याशा गावी एकत्र कुटुंबात रहात होता. त्याचे वडिल पानाच्या ठेल्यावर काम करत असत. त्यांना महिन्याला अवघे १०० रूपये मिळत असत. इतर मुलांप्रमाणे तो शारीरिक कामं करू शकत नसला तरी नव्या गोष्टी झटपट शिकून घेत असे. प्रत्येक गोष्ट तो अगदी मनापासून करत असे. शिवमचा हाच गुण ओळखून वडिलांनी त्याला शिक्षण द्यायचं ठरवलं. शिक्षणामुळेच तो स्वावलंबी आणि सक्षम बनू शकेल, असं त्यांना वाटायचं. शाळेत असताना शिक्षकांना त्याचं कौतुक होतं पण, इतर मुलं त्याची मस्करी करत असत. सुरूवातीला तो हिंदी माध्यमात शिकला. त्यानंतर त्याला इंग्रजी माध्यमात घालण्यात आलं. इथेही स्वत:च्या बुद्धीच्या जोरावर त्याने नाव कमावलं. वडिलांनी त्याला स्कूटर आणून दिली. त्यामुळे तो एकट्याने प्रवास करू लागला. या घटनेने त्याच्या आयुष्याला नवं वळण मिळालं.

शिवमला सतत काही तरी नवं करायला आवडतं. तो पोहायला शिकला. प्रशिक्षकांनी त्याची पॅराऑलिम्पिकसाठी तयारी करून घेतली. त्याने गेट परीक्षा दिली. त्याला आयआयटी पाटणामध्ये प्रवेश मिळाला. त्याने बीएसएनएलमध्ये टेलिकॉम ऑफिसर म्हणून कामाला सुरूवात केली. आज तो कॉम्प्युटर इंजिनिअर, प्रोग्रामर आहे. मोटिव्हेशनल स्पीकर म्हणून तो भाषणं देतो. त्याला पोहता येतं, गाता येतं. तो कविता करतो. तो गिटार वाजवायला शिकला आहे. आशा आणि आत्मविश्वासाच्या जोरावर त्याने सगळं मिळवलं आहे. इतरांसाठी आशास्थान बनण्याचा त्याचा मानस आहे.

**अचिव्हर**

# फंडे सेफ बायकिंगचे



दोस्तांनो, मोटरसायकल कितीही आकर्षक वाटत असली तरी चार चाकी गाड्यांइतकी सुरक्षित नसते. झिप झॅप झूम... करत वाहतुकीतून वाट काढताना थ्रीलिंग वाटतं खरं! पण ते जीवघेणं तर ठरत नाही ना, याचा विचार व्हावा. बाईकवरून वाऱ्याच्या वेगावर स्वार व्हायला छान वाटतं. पण बाईक घसरली तर सुरक्षा मिळत नाहीं. तुम्ही स्वत: सुरक्षित राहायला हवंच. शिवाय इतरांच्या सुरक्षेचा विचारही करायला हवा. यासाठीच्या काही टिप्स...

बाईकचे लायसन्स मिळवण्यासाठी आधी ती आपल्याला यायला हवी. त्यामुळे आधी बाईक नीट शिकून घ्या. बाईक चालवण्याचं तंत्र शिकवणारे क्लासेस असतात. आपल्या सुरक्षेसाठी काय करायचं, याचे धडेही अशा ठिकाणी दिले जातात. नवी बाईक घ्यायची तर अशा क्लासेसना जाता येईल.

**बायकिंग**

* दोस्तांनो, शॉर्टस आणि साध्या चपला घालून बाईक चालवणारे बरेचजण दिसतील. पण बाईक चालवताना सुरक्षा मिळावी, यासाठी कपडेही तसेच हवे. म्हणून अनेकजण लेदरचा वापर करताना दिसतात. लेदर जॅकेट्स आणि पँट्स घातल्याने बाईक घसरली तरी थोडी सुरक्षा मिळू शकते.
* बाईक चालवताना पायांनाही सुरक्षा मिळायला हवी. त्यामुळे बूट योग्य पद्धतीचे हवेत. बाईकचं गियर बदलताना पायांचा वापर केला जातो. फ्लिपफ्लॉपमुळे पाय घसरू शकतो. पायांना स्थैर्य देणारे शूज घाला.
* मोटरसायकल चालवणं एक कला आहे. इतर प्रत्येक कलेप्रमाणे ती नीट यायला हवी. यासाठी बाईक चालवायला नीट शिकून घ्यायला हवं.
* बाईक चालवताना गाणी ऐकणं, फोनवर बोलणं, इकडे तिकडे बघणं असं काहीही नको. आसपास काय चाललंय, याकडे नीट लक्ष द्या. आजूबाजूच्या वाहतुकीचा अंदाज घ्या. वाहतुकीच्या वेगानुसारच बाईक हाका. तुमचं संपूर्ण लक्ष बाईकवर केंद्रीत करा.

# फूड केमिस्ट होण्यासाठी...

आपण खात असलेलं अन्न दर्जेदार आणि सकस असायला हवं. या अन्नामुळे शरीराचं कोणतंही नुकसान होऊनये, असा आपला प्रयत्न असतो. अन्न दर्जेदार आहे किंवा नाही हे फूड केमिस्ट ठरवतात. खाण्या-पिण्याची आवड असेल तर तुम्हीही हे क्षेत्र निवडू शकता. रसायनशास्त्र, विज्ञान आणि अन्न अशा तिन्हींमध्ये रस असेल तर तुम्ही फूड केमिस्ट म्हणून स्वत:चं करीअर घडवू शकता. लोकांना सकस आणि उत्कृष्ट अन्न मिळावं, अशी तुमची इच्छा असेल तर हे क्षेत्र तुमच्यासाठी अगदी योग्य आहे. अन्न आणि अन्नातले घटक आरोग्यादायी असावेत, यावर फूड केमिस्टचा भर असतो. हुशारी आणि भावनिक स्थैर्य या दोन्ही गोष्टी या क्षेत्रातल्या करीअरसाठी गरजेच्या आहेत. फूड केमिस्टला बरंच संशोधन करावं लागतं. त्यांना प्रयोगशाळांमध्ये काम करावं लागतं. या क्षेत्रात येण्यासाठी संवादकौशल्य गरजेचं आहे. आपलं संशोधन, निष्कर्ष इतरांपर्यंत पोहोचवण्याची कला तुमच्याकडे असायला हवी. कारकिर्दीत किती उंची गाठायची आहे यावरून या क्षेत्रातलं शिक्षण ठरतं. शिक्षण जेवढं जास्त तेवढ्या संधीही जास्त मिळतात. या क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी रसायनशास्त्र, फूड केमिस्ट्री आणि बायोलॉजी या विषयांचा पाया भक्कम असायला हवा. रसायनशास्त्र, फुड केमिस्ट्री, फार्मास्युटिकल केमिस्ट्री किंवा फूड सायन्स या विषयांमध्ये पदवी मिळवून पुढे जाता येईल. या क्षेत्रासाठी उमेदवाराकडे सामाजिक दृष्टीकोन असणं महत्त्वाचं आहे.



**फ्युचर ऑप्शन्स**

# घुमना भी, फिटनेस भी



दोस्तांनो, भटकंतीला गेल्यावर फिटनेसकडे थोडं दुर्लक्षच होतं. रूटीनमधून ब्रेक घेतल्याने मग सगळं कसं अगदी निवांत असतं. त्यामुळे व्यायामाला आपोआप सुटी मिळते. खादाडीही जरा जास्तच होते. मग काय वजन वाढतं. पण, भटकंतीदरम्यानही तुम्ही फिटनेस जपू शकता.

**भटकंती**

* नव्या वातावरणाचा आनंद लुटताना शारीरिक हालचालही करा. दररोज काही तरी ठरवा. सायकल भाड्याने घ्या. सायकल चालवत निसर्गाचा आनंद लुटा. जिने चढा. शक्य तितकं चाला, हायकिंग करा. जवळच्या बागेत फेरफटका मारा.
* नव्या ठिकाणी चालत फिरण्यासारखी मजा नाही. या निमित्ताने स्थानिक संस्कृती जवळून पाहता येते. शहरात चालत भटकंती करा.
* साईटसीईंगला निघण्याआधी थोडा व्यायाम करा. यानंतर हेल्दी ब्रेकफास्ट घ्या. यामुळे तुम्ही दिवसभर ताजेतवाने राहू शकाल. व्यायामामुळे तुमच्या कॅलरी खर्च होतील. दिवसभर उत्साह वाटेल.
* तिकिटांच्या खरेदीसाठी किंवा पर्यटनस्थळी रांग लावावी लागत असेल तर फक्त उभे राहू नका. थोडं जॉगिंग करा. पोट आत घेऊन दीर्घ श्वसन करा. हातापायांचे व्यायामही करता येतील. लोकांनी थोडं विचित्र नजरेने पाहिलं तरी काळजी करू नका. यामुळे तुम्हाला खूप उत्साही वाटेल.



# एक्सपरिमेंट्स विथ परफ्युम्स

**ग्रूमिंग**

मित्रांनो, तुमच्या वॉर्डरोबमध्ये एखादा परफ्युम असेलच. परफ्युममुळे मस्त वातावरण तयार होतं. यार-दोस्तांची मैफल जमली असेल तर परफ्युम मस्टच. डेटवर जाताना तर परफ्युम शिंपडायलाच हवा. पेहरावाप्रमाणे परफ्युमही मिक्स अँड मॅच करता येतो. परफ्युम वापरतानाही निरनिराळे प्रयोग करता येतात. हे नेमकं कसं साधायचं हे जाणून घेऊया.

* कपड्यांवर सौम्य परफ्युम शिंपडता येईल. तर शरीरावर थोडं उग्र वासाचं परफ्युम चालून जाईल. एकाच वेळी ही दोन्ही परफ्युम्स कॅरी करता येतील. कपड्यांवरचा परफ्युम उडून गेला तरी शरीरावरचा सुगंध दरवळत राहील.
* एकाच वेळी वेगवेगळ्या कंपन्यांची परफ्युम्स शिंपडल्याने सगळ्याचा पार विचका होऊ शकतो. डोकं दुखायला लागतं. त्यामुळे एकाच प्रकारचा सुगंध असलेल्या दोन परफ्युम्सचं कॉम्बिनेशन करा.
* परफ्युम्सचं कॉम्बिनेशन करताना तुम्ही कल्पकता वापरू शकता पण, वुडी, फ्लोरल, फ्रेश आणि सिट्रस अशा सुगंधांमध्ये प्रयोग करा.
* परफ्युम्सचं लेअरिंग करताना थोडी काळजी घ्यायला हवी. एखादा परफ्युम कपड्यावर शिंपडल्यावर वेगळा वास येऊ शकतो तर शरीरावरचा वास वेगळा असू शकतो. त्यामुळे कोणता वास जास्त चांगला वाटेल, हे आधी ठरवा.
* परफ्युमचा वास जास्त काळ टिकवून ठेवायचा असेल तर ते शिंपडण्याआधी चांगलं बॉडी लोशन किंवा सुगंधी तेलाने शरीराला मसाज करा.

# कडकी लागलीये?



दोस्तांनो, खिशात कितीही पैसा खुळखुळत असला तरी कडकीची वेळ कधीतरी येतेच. पैशांची तंगी जाणवत असताना काही सुचतच नाही. कधी पगार उशीरा होतो तर कधी कर्जाचे, क्रेडिट कार्डाचे हप्ते फेडण्याच्या नादात हातात काहीच उरत नाही. अशा वेळी कोणाकडून पैसे उधार तरी घ्यावे लागतात किंवा आहे त्यातूनच भागवावं लागतं. या परिस्थितीत पैसा कसा वापरायचा? जाणून घेऊ. पैसा नसेल तर सवलतींचा शोध घ्यायला सुरूवात करा. बाय वन गेट वन फ्री, ५० टक्के डिस्काउंट अशा योजना असतात. सुपरमार्केट, हायपरमार्केटमध्ये अशा सवलती वर्षभर सुरू असतात. कपडे सेलमधून घ्या. ऑनलाईन शॉपिंगवर बऱ्यात सवलती असतात. सणावारी अशा साईट्स योजना जाहीर करतात. तेव्हा खरेदी करा आणि पैसे वाचवा. वर्तमानपत्रासोबत येणारी डिस्काउंट कुपन्स जपून ठेवा.

**मनी मॅनेजमेंट**

* रेडी टू ईट फूडच्या किंमती बऱ्याच असल्याने पैसा खर्च होतो. यातून पोषणमूल्यंही मिळत नाहीत. त्यामुळे थोडा फार स्वयंपाक शिका. आमटी भात, मुगाच्या डाळीची खिचडी असे पदार्थ बनवता येतील. यामुळे बाहेरील पदार्थासाठी खर्च होणारे बरेच पैसे वाचतील.
* किराणाच्या किंमती सतत कमी-जास्त होतात. दर कमी झाले की वर्षभराचं सामान भरून ठेवा.
* क्रेडिट कार्डामुळे खर्च भरपूर वाढतो. त्याऐवजी डेबिट कार्ड वापरा. यामुळे जितके पैसे आहेत तेवढाच खर्च होईल.

**स्मार्ट गॅझेट**

## वायफाय कनेक्ट होत नाही?

आता टीव्हीही स्मार्ट झाला आहे. टीव्ही वायफायशी कनेक्ट करून विविध ॲप्स डाउनलोड करता येतात. मात्र कधीकधी स्मार्ट टीव्हीला कनेक्ट केलेलं वायफाय डिसकनेक्ट होतात आणि ते पुन्हा कनेक्ट करताना बऱ्याच अडचणी येतात. अनेकदा हार्डवेअरशी संबंधित समस्येमुळे काही समस्या उद्भवू शकतात. वायफाय अन्य डिव्हाइसशी कनेक्ट करून बघा. अन्य डिव्हाइसशी राउटर कनेक्ट झाल्यास तुम्ही राउटर टीव्हीशी पुन्हा जोडून घ्या. स्मार्ट टीव्हीमध्ये इंटरनेट कनेक्शन तपासण्यासोबतच त्यातील समस्यांचं निराकरण करण्याचा म्हणजेच ट्रबलशूटचा पर्यायही मिळतो. यासाठी टीव्हीच्या सेटिंग्जमध्ये जाऊन नेटवर्क सेटिंग्जचा पर्याय निवडा. इथे नेटवर्क स्टेटस दिसेल. तुम्ही टीव्ही रिबूट करण्याचा पर्याय निवडू शकता. कोणताही उपाय कामी न आल्यास फॅक्टरी रिसेट हा अंतिम पर्याय निवडून बघा.



**स्मार्ट टिप्स**

## फोन चार्ज करताय?

स्मार्टफोनची बॅटरी लो होऊ लागल्यानंतर आपल्या हृदयाची धडधड वाढू लागते. मग मिळेल त्या ठिकाणी स्मार्टफोन चार्जिंगला लावला जातो पण सार्वजनिक ठिकाणी स्मार्टफोन चार्ज करणं धोक्याचं ठरू शकतं. तुमच्या फोनमधला सगळा डाटा हॅक होऊ शकतो. ऑथेंटिक ८ नावाच्या सिक्युरिटी फर्मने हा दावा केला आहे. सार्वजनिक ठिकाणचं चार्जिंग सॉकेट हॅक केलेलं असू शकतं. अशा सॉकेटमुळे तुमच्या स्मार्टफोनचा सगळा डाटा लीक होऊ शकतो. तुमचे मेल्स, मेसेजेस, अकाउंट नंबर सगळं हॅकर्सपर्यंत पोहचू शकतं. त्यामुळे सार्वजनिक ठिकाणी फोन चार्जिंगला लावण्यासाठी दहा वेळा विचार करा.



**सोशल मिडिया**

## धोका फेक डिलिव्हरी स्कॅमचा

ऑनलाईन शॉपिंग ही आता सर्वसामान्य बाब बनली आहे. विविध साईट्वरून ऑनलाईन खरेदी केली जाते. मात्र अशा पद्धतीने खरेदी करताना फसवणूक होण्याची शक्यता असते. म्हणूनच प्रत्येक पाऊल जपून टाकायला हवं. सध्या फेक डिलिव्हरी किंवा कॅश ऑन डिलिव्हरीचा बहाणा करून युजर्सची फसवणूक होत आहे. हॅकर्स फ्लिपकार्ट किंवा ॲमेझॉनसारख्या ई कॉमर्स साईट्सचे डिलिव्हरी एजंट असल्याची बतावणी करून बँक खात्यातून पैसे गायब करत आहेत. हे प्रकार थांबवण्यासाठी ई कॉमर्स कंपन्यांनी डिलिव्हरीच्या वेळी ओटीपी देऊन वस्तू घेण्याचं आवाहन केलं आहे. मात्र यामुळे डोकेदुखी वाढली आहे. हॅकर्स किंवा स्कॅमर्स डिलिव्हरी एजंट बनून तुमच्या दाराशी येतात. वस्तू देण्याआधी ओटीपी विचारतात. या जाळ्यात अडकून आपण ओटीपी दिला तर स्कॅमर आपल्या फोनचं क्लोन तयार करतात. या माध्यमातून आपल्या बँक खात्याचा ॲक्सेस त्यांना मिळू शकतो. सातत्याने ऑनलाईन शॉपिंग करणाऱ्यांना लक्ष्य केलं जात आहे. त्यामुळे तुम्ही जपून रहायला हवं.

**ॲप वर्ल्ड**

## व्हॉट्स ॲप मेमरी खातंय?

व्हॉट्स ॲपमुळे तुम्हाला स्टोरेजची समस्या भेडसावतेय का? व्हॉट्स ॲपवर येणारे व्हिडिओ तसंच फोटोज गॅलरीत सेव्ह होत असल्यामुळे फोन मेमरी फुल होते. यामुळे फोन स्लो होतो. हे ओव्हरलोडिंग तुम्ही टाळू शकता. यासाठी व्हॉट्स ॲपच्या फाईल्स मोबाईलमधली किती जागा व्यापत आहेत हे आधी जाणून घ्या. यासाठी व्हॉट्स ॲपच्या सेटिंग्जमध्ये जा. स्टोरेज अँड डाटा ऑप्शनवर क्लिक करा. इथे मॅनेज स्टोरेज पर्यायावर क्लिक करून फोन मेमरीची माहिती मिळवता येईल. व्हॉट्स ॲप मीडिया डिलिट करण्यासाठी मॅनेज स्टोरेजवर लार्जर दॅन ५ एमबीवर क्लिक करा. इथून नको असणाऱ्या मीडिया फाईल्स सिलेक्ट करून डिलिट करता येतील. यासोबतच ऑल फाईल डिलिटचा पर्यायही आहे.



# परभणी घटनेमध्ये विटंबना करणाऱ्या आरोपीवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करा

## समस्त आंबेडकरी समाजाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर निदर्शने, मृत्युमुखी पडलेल्या सूर्यवंशी कुटुंबियाचे पुनर्वसन करा

नगर – परभणी येथे घडलेल्या संविधान शिल्पाची विटंबना करणाऱ्या सोपान पवार यांच्या विरोधात देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून विटंबने विरोधात आंदोलन करणाऱ्या आंबेडकरी समाज बांधवांवर प्रशासनाने केलेल्या अन्यायग्रस्त कारवाई विरोधात व दडपशाही संदर्भात जिल्हाधिकारी यांना समस्त आंबेडकरी समाजाच्या वतीने निवेदन देण्यात आले.

यावेळी अशोक गायकवाड, सुमेध गायकवाड, अजय साळवे, किरण दाभाडे, अमित काळे, योगेश थोरात, डी.आर.जाधव, सागर ठोकळ, नितीन कसबेकर, विशाल भिंगारदिवे, गौतमीताई भिंगारदिवे, सुरेशराव भिंगारदिवे, वैभव जाधव, नवीन भिंगारदिवे, प्रकाश कांबळे, जीवन कांबळे, सिद्धांत कांबळे, गौतम वाघमारे, अनंत लोखंडे, सदाशिव भिंगारदिवे, चंद्रकांत भिंगारदिवे, पंकज लोखंडे, सचिन जमदाडे, विजय जाधव, अमोल काळे, आदित्य भिंगारदिवे, येशुदास वाघमारे, सतीश साळवे, पप्पू पाटील, संदीप वाकचौरे, विजय शिरसाठ, लखन सरोदे, हिराबाई भिंगारदिवे, रंजना भिंगारदिवे, राधा पाटोळे, विशाल गायकवाड, सारंग पटेकर, प्रशांत कदम, सचिन जमदाडे, सागर पोळ, विनोद भिंगारदिवे, रोहन शिंदे, शांतवन साळवे, अजित घाटविसावे, विद्या शिंदे, प्रा. जाधव एल बी, सिद्धार्थ पवार, सिद्धांत गायकवाड, अक्षय बोरुडे, विलास साठे सर, राम ठुबे, दया गजभिये, शनेश्वर पवार, विशाल कांबळे, योगेश त्रिभुवन, पिंट्या उबळे, सिद्धार्थ भिंगारदिवे, सिद्धार्थ राजगुरु, सचिन शेलार, महेंद्र वाघचौरे, दादू मगर आदीसह समाज बांधव उपस्थित होते.



परभणी घटनेमध्ये विटंबना करणाऱ्या आरोपीवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करा या मागणीसाठी समस्त आंबेडकरी समाजाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर निदर्शने करण्यात आली.

पुढे निवेदनात म्हटले आहे की, पोलिसांच्या कोंबिंग ऑपरेशनची आणि एकूण सर्व प्रकरणाची न्यायालयीन चौकशी करावी तसेच कलम १७६(१अ) सी आर पी सी अन्वये या प्रकरणाची चौकशी करावी. न्यायालयीन चौकशी ही सेवानिवृत्त न्यायाधीशामार्फत न करता न्यायाधीशामार्फत करण्यात यावी. पोलीस निरीक्षक अशोक घोरबांड सह इतर पोलीस अधिकाऱ्यांवर कलम ३२ अन्वये अ‍ॅट्रॉसिटी कायद्यान्वये गुन्हे दाखल करण्यात यावे व सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात यावा परभणी शहरातील सर्व पोलीस स्टेशन मधील सीसीटीव्ही तातडीने जप्त करून त्यांचे फुटेज तपासावेत. सोमनाथ व्यंकट सूर्यवंशी यांच्या कुटुंबीयांना सरकारने तातडीने ५० लाखाची आर्थिक मदत जाहीर करावी.सूर्यवंशी यांच्या कुटुंबातील एका व्यक्तीस तातडीने शासकीय नोकरी देऊन त्याचे पुनर्वसन करावे. श्रीमती वसल्लयाबाई मानवते या महिलेस मारहाण करणाऱ्या पोलिसांवर तातडीने कलम ३५४/३०७ अंतर्गत गुन्हे दाखल करून त्यांना निलंबित करण्यात यावे तसेच न्यायालयीन कोठडीत असलेल्या आणि रुग्णालयात उपचार घेत असलेल्या सर्वांचे पुन्हा एकदा न्यायधीशांच्या देखरेखित मेडिकल करावे. पोलिसांनी केलेल्या कोंबिंग कारवाईत बौद्ध वस्तीतील लोकांच्या झालेल्या घराची नुकसान भरपाई द्यावी जिल्हा प्रशासनाने त्या सर्व घरांचे तातडीने पंचनामे करून घ्यावेत तसेच संविधान शिल्पाची विटंबना करणाऱ्या सोपान पवार या समाजकंटकावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात यावे, अशी मागणी समस्त आंबेडकरी समाज बांधवांच्या वतीने करण्यात आली असून या मागणीचे निवेदन जिल्हाधिकारी यांना देण्यात आले.

# राष्ट्रीय चर्मकार महासंघ व चर्मकार संघर्ष समितीच्या वतीने परभणी येथे घडलेल्या घटनेचा निषेध, सखोल चौकशी करा

नगर – राष्ट्रीय चर्मकार महासंघ व चर्मकार संघर्ष समिती महाराष्ट्र राज्यच्या वतीने परभणी जिल्ह्यात घडलेल्या संविधान अवमान प्रकरणी निषेध नोंदवून या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याच्या मागणीसाठी जिल्हाधिकारी यांना निवेदन देताना चर्मकार संघर्ष समितीचे संस्थापक अध्यक्ष शिवाजी साळवे, राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब केदारे, लक्ष्मण साळे मेजर, संतोष त्रिंबके, विशाल बेलपवार, विजय दळवी, विठ्ठल जयकर, सोमनाथ केदारे, चंद्रकांत नेटके, सुनील केदार, नंदकुमार गायकवाड, निलेश सुरसे, प्रशांत घाडगे, रामकिसन साळवे मेजर, सुभाष झरेकर आदी उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे की, परभणी जिल्ह्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यासमोरील चौकात संविधान प्रतिकृतीची माथेफिरूने अवहेलना केली होती. या घटनेचा राष्ट्रीय चर्मकार महासंघ व चर्मकार संघर्ष समिती यांच्या वतीने अशा विकृत प्रकाराचा जाहीर निषेध करून या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन त्वरित चौकशी करण्यात यावी व यामागील खऱ्या सूत्रधाराला अटक करण्यात यावी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानामुळे सर्व समाज घटकांना समतेच्या माध्यमातून न्याय मिळत आहे परंतु काही घाणेरडे प्रवृत्तींना हे मान्य नाही अशा प्रवृत्तीचे सूत्रधार यांच्यावर त्वरित कारवाई होणे गरजेचे आहे अन्यथा या विषयावर संपूर्ण महाराष्ट्रभर तीव्र आंदोलन करण्यात येणार असल्याचे निवेदनात म्हटले आहे.



परभणी येथे घडलेल्या घटनेची सखोल चौकशी करावी, या मागणीचे निवेदन राष्ट्रीय चर्मकार महासंघ व चर्मकार संघर्ष समितीच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले.



कस्टडीमध्ये सोमनाथ सूर्यवंशी यांना मारणाऱ्या पोलिसांवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करा या मागणीचे निवेदन मोर्चाने जाऊन कोतवाली पोलीस स्टेशन येथील पोलीस निरीक्षक यांना देताना रिपाई आंबेडकर पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व भीमसैनिक.

# कस्टडीमध्ये सोमनाथ सूर्यवंशी यांना मारणाऱ्या पोलिसांवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा

## कुटुंबीयांना ५० लाख रुपये शासनाने मदत जाहीर करावी व कुटुंबीयांचे पुनर्वसन करावे

नगर – परभणी येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळील संविधान प्रतिमेची मोडतोड करणाऱ्या समाजकंटकास व इतर गुन्हेगारास देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून अटक करण्यात यावी. पोलीस कस्टडीमध्ये मृत्यू पावलेल्या सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मारेकऱ्यास चौकशी करून अटक करण्यात यावी व मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याच्या मागणीसाठी रिपाई आंबेडकर पक्ष व समस्त भीमसैनिकांच्या वतीने शहरातून मोर्चा काढण्यात आला. कोतवाली पोलीस स्टेशन येथील पोलीस निरीक्षक यांना निवेदन रोहित आव्हाड यांच्या नेतृत्वाखाली देण्यात आले. यावेळी समाज बांधव व भीमसैनिक उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळील संविधान प्रतिमेची तोडफोड करून समस्त आंबेडकरी अनुयायाची भावना दुखावली गेली. एलएलबी शिक्षण घेणाऱ्या व शांततेच्या माध्यमाने आंदोलन करणाऱ्या सोमनाथ सूर्यवंशी या भीमसैनिकास ताब्यात घेऊन त्याला अटक केली व त्यास अमानुषपणे मारहाण करण्यात आली. त्याचा पोलीस कस्टडीमध्ये मृत्यू झाला त्यामुळे मारहाण करणाऱ्या पोलिसांवर तात्काळ चौकशी करून कारवाई करण्यात यावी. मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात यावा. सूर्यवंशी यांच्या कुटुंबीयांना ५० लाख रुपये शासनाने मदत जाहीर करावी व कुटुंबीयांचे पुनर्वसन करण्याची मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

# शेतकऱ्याचे घर दिवसा फोडून ६८ हजार रुपयांचा ऐवज लांबविला

नगर – नगर तालुक्यातील भातोडी शिवारातील शेतकऱ्याचे घर चोरट्यांनी दिवसा फोडले. सुमारे सव्वा दोन तोळ्यांचे सोन्याचे दागिने व तीन तोळ्यांचे चांदीचे दागिने असा ६८ हजार रूपयांचा ऐवज चोरून नेला आहे. सदरची घटना १० डिसेंबर रोजी सकाळी नऊ ते दुपारी तीनच्या दरम्यान घडली असून याप्रकरणी रविवारी (दि.१५) सायंकाळी नगर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत बबन किसन खिळदकर (वय ५२) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांचे भातोडी शिवारात राहते घर आहे. १० डिसेंबर रोजी सकाळी नऊ ते दुपारी साडेतीनच्या दरम्यान चोरट्याने फिर्यादीच्या घराचे सेफ्टी दरवाजाचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. घरातील सामानाची उचकापाचक केली. बेडरूम मधील लाकडी कपाटाचे लॉक तोडून त्यातील ८ ग्रॅमचे सोन्याचे नेकलेस, १० ग्रॅमचे सोन्याचे मनीमंगळसूत्र, चार ग्रॅमची सोन्याची कर्णफुले व ३० ग्रॅमचे पायातील चांदीच्या पट्ट्या असा सुमारे ६८ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला. सदरचा प्रकार दुपारी साडेतीनच्या सुमारास लक्षात आला.

दरम्यान, फिर्यादी यांनी रविवारी (दि.१५) नगर तालुका पोलिसांना घरफोडीची माहिती दिली. सहायक पोलीस निरीक्षक प्रल्हाद गिते यांनी पथकासह घटनास्थळी भेट दिली. अधिक तपास महिला पोलीस अंमलदार एम. व्ही. कर्डक करत आहेत.


SHRIRAM HOUSING FINANCE

# श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

**मुख्य कार्यालय:** लेव्हल-३, वोक्खार्ड टॉवर्स, इस्ट विंग, सी-२ ब्लॉक, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१. दुर.:०२२-४२४१०४००, ०२२-४०६०३१००. **वेबसाईट:** http://www.shriramhousing.in.
**नोंदणीकृत कार्यालय:** श्रीनिवास टॉवर, पहिला मजला, दरवाजा क्र. ५, जुना क्र. ११, दुसरी लाईन, सेनाटोफ रोड, अलवार पेठ, तेनाम पेठ, चेन्नई ६०००१८
**शाखा कार्यालय:** २०२, दुसरा मजला, मदने आर्केड एफपी नं. १४२ झोपडी कॅन्टीन जवळ, आरबीएल बँकेसमोर सावेडी रोड, अहमदनगर ४१४००३

**परिशिष्ट-४-ए** (नियम ८(६) ची तरतूद पहा) **स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता विक्री सूचना**

**सिक्युरीटायझेशन अ‍ॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फिनान्शियल अ‍ॅसेटस् अ‍ॅन्ड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अ‍ॅक्ट २००२ सहवाचिता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ८(६) च्या तरतुदीअन्वये स्थावर मालमत्तेचे विक्रीकरिता ई-लिलाव विक्री सूचना.**

सर्वसामान्य जनतेस व विशेषतः कर्जदार आणि जामिनदारांना येथे सूचना देण्यात येत आहे की, **श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड**कडे तारण/अधिभारीत असलेल्या खाली नमुद केलेल्या स्थावर मालमत्तेचा वास्तविक ताबा **श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड**च्या (एसएचएफएल) प्राधिकृत अधिकाऱ्यांनी घेतलेला आहे आणि खाली नमुद केलेले कर्जदार व जामिनदारांकडून **श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड** यांना देय असलेली खाली तक्त्यात नमुद रक्कम वसुलीकरिता खाली दिलेल्या तपशिलानुसार ई-लिलाव आधारावर **जसे आहे जेथे आहे, जसे आहे जे आहे आणि जसे जेथे आहे या तत्त्वावर दिनांक २१.१.२०२५ रोजी स.१ ते दु.२ दरम्यान** ई-लिलावाने विक्री केली जाईल. कर्जदार, जामिनदार, तारणकर्ता, देय रक्कम, स्थावर मालमत्तेचे लघु वर्णन व ज्ञात अधिभार, ताबा प्रकार, आरक्षित मुल्य व इसारा रक्कम आणि वाढिव मुल्याचे तपशील खालीलप्रमाणे:

| कर्जदार/सह-कर्जदार/ जामिनदार/तारणकर्ताचे नाव | १३(२) मागणी सूचना तारीख व रक्कम | आरक्षित मूल्य (रु.) व बोली वाढविणे | इसार रक्कम ठेव (इरठे तपशील) | लिलावाची तारीख व वेळ | संपर्क व्यक्ती व निरीक्षण तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १) श्री. तानाजी साहेबराव धावरे<br>२) सौ. रेणुका तानाजी धावरे<br>दोघांचा राहण्याचा पत्ता : रो.हाऊस नं.५, श्री स्वामी समर्थ रेसिडेन्सी, प्लॉट नं.६ ते ११/०३ (दक्षिण भाग) सर्व्हे नं.७२/५ उभा मारुती जवळ, बोल्हेगाव, अहमदनगर ४१४००१<br>दुसरा पत्ता – झाडबुके मैदान, बार्शी, सोलापूर, महाराष्ट्र ४१३४०१<br>कर्ज खाते क्र.एसएचएलएचएएम डीआर ०००४५४<br>ताबा दिनांक व ताबा प्रकार<br>३०/०९/२०२४ भौतिक ताबा<br>प्रत्यक्ष ताबा<br>माहित नाही | मागणी सूचना तारीख १२/०९/२०२३<br>दि.११/०९/२०२३ रोजी कर्ज खाते क्र. कर्ज संदर्भ क्रमांक एसएचएलएचएएमडीआर ०००४५४ अंतर्गत १०,८०,९४६/- (रुपये दहा लाख ऐंशी हजार नऊशे शेहेचाळीस फक्त) करारानुसार पुढील व्याजासह पूर्ण आणि अंतीम पेमेंट केल्याच्या तारखेपर्यंत आनुशंषिक खर्च, खर्च शुल्क इत्यादीसह वरील रकमेवर SHFL/NHB/RBI द्वारे वेळोवेळी करारानुसार पुढील व्याजासह आणि/ किंवा निर्धारिक केल्यानुसार | रुपये १०,९८,५२२ (दहा लाख अठ्ठ्याणव हजार पाचशे बावीस)<br>**बोली वाढविणे** रुपये १०,०००/- (दहा हजार रुपये)<br>इसारा रक्कम (इरठे) (रुपये)<br>रुपये १,०९,८५२.२/- (एक लाख नऊ हजार आठशे बावन्न दोन पैशे फक्त)<br>इरठे सादर करण्याची अंतिम तारीख<br>**ईएमडी २० जानेवारी २०२५ वेळ : सकाळी १०.०० ते दुपारी ०५.००** | इएमडी रक्कम ठेवीची रक्कम आर टी जी एस एन ई एफ टी इरठे रक्कम खाली नमूद केलेल्या खाते तपशिला नुसार जमा करावी.<br>बँकेचे नाव : अ‍ॅक्सिस बँक लिमिटेड<br>शाखा : बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स मुंबई<br>बँक खाते क्र. चालू खाते क्र. ९११०२००४५६७७६३३<br>आय.एफ.एस.सी. कोड यु.टी.आय.बी. ०००२३० | २१ जानेवारी २०२५<br>वेळ- दुपारी १.०० ते दुपारी २.०० | सुनील मानेकर ८९९९३४४८९७<br>अशफाक पत्का ९८१९४१५४७७<br>मयूर भोजने ८८९८५२७०७६<br>निरीक्षण तारीख २३ डिसेंबर २०२४<br>वेळ : दुपारी १२.०० ते दुपारी ०३.०० |

**१) मालमत्तेचे वर्णन :** स्थावर मालमत्तेचा सर्व तुकडा आणि पार्सल बेअरिंग रोहाऊस/ब्लॉक नं.५ प्लॉट एरियाचे माप ७३.९० स्क्वेअर मीटरचे बांधकाम, क्षेत्र १८.३४ स्क्वेअर मीटरसह श्री स्वामी समर्थ रो रेसिडेन्सीचे योग्यरित्या प्लॉट क्रमांकावर बांधण्यात आलेल्या नं.६ ते ११/३ सर्व्हे नं.७२/५ च्या बाहेर अहमदनगर महानगरपालिका हद्दीत वसलेले आहेत. बोल्हेगाव, ता.जि.अहमदनगर ४१४००१ आणि अहमदनगर आणि सिमाअंतर्गत उत्तर – प्लॉट नं.६ ते ११/३ (रो हाऊस नं.६), दक्षिण – प्लॉट नं.६ ते ११/३ (रो हाऊस नं.४), पूर्व – रोड, पश्चिम – मागील बाजूचे प्लॉट मार्जिन

कोणतेही कारण न दर्शविता काही किंवा सर्व बोली नाकारण्याचा अधिकार प्राधिकृत अधिकाऱ्याकडे राखून आहे. विक्रीच्या सविस्तर नियम व अटीकरिता आणि निविदा सादर करण्याचे ठिकाण, निविदा उघडणे व लिलावाचे ठिकाण याकरिता कृपया आमच्या वेबसाईटला तसेच श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेडच्या **http:// shriramhousing.in/e-auction-Residential** वर श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेडच्या वेबसाईटवर दिलेल्या वेबसाईटला भेट द्या.
जे संकेतस्थळाच्या **https:// shriramhousing.in/e-auction-Residential** या पत्त्यावर श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेडच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. ऑनलाईन लिलाव आमची लिलाव एजन्सी सी १ इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, पत्ता: प्लॉट क्र. ६८, ३ रा मजला, सेक्टर ४४, गुरुग्राम १२२००३, हरयाणा यांच्या **https:// www. bankeauctions.com** या वेबसाईटवर पार पाडला जाईल. कोणत्याही सहाय्यासाठी, तुम्ही **tnc1india.com, supportbankeauctions.com** या इमेल आयडीवर इमेल पाठवू शकता.
सूचना : कृपया नोंद घ्या की, सिक्योंड कर्ज घेणाऱ्याला/खात्रीदाराला सेल नोटीस जारी करणार आहे. जी स्पिड/रजिस्टर्ड पोस्ट/कुरिअर केली जाईल. जर कोणत्याही पक्षाला ती न मिळाल्यास हे सेल नोटिसीचे प्रकाशन सेवेचा पर्यायी मार्ग असे समजले जाईल.

सरफायसी कायदा २००२ च्या नियम ८(६) अन्वये वैधानिक ३० दिवसांची विक्री सूचना:
कर्जदार/तारणकर्ता/जामिनदार यांना येथे सुचित करण्यात येत आहे की, ई-लिलावाच्या तारखेपुर्वी अर्थात २१.१.२०२५ पुर्वी व्याजासह वर नमुद केलेली संपुर्ण रक्कम जमा करावी, अन्यथा मालमत्तेचा लिलाव/विक्री केली जाईल आणि उर्वरित रक्कम असल्यास ती व्याज व शुल्कासह वसुल केली जाईल.

ठिकाण : अहमदनगर (अहिल्यानगर)
दिनांक : १७.१२.२०२४

सही/- प्राधिकृत अधिकारी
श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड


# नायलॉन मांजा विक्री करणाऱ्यांवर छापेमारी

## ५१ हजाराचा नायलॉन मांजा केला जप्त, तिघांवर गुन्हे दाखल

नगर – राज्यात नायलॉन मांजा विक्री व वापरास बंदी असतानाही शहरात सर्रास नायलॉन मांजा विकला जात आहे. त्यामुळे पक्ष्यांना, प्राण्यांना व मानवी जिवितास तीव्र इजा होऊन अपघात होण्याची शक्यता आहे. म्हणून अशा नायलॉन मांजा विक्री करणाऱ्यांवर पोलिसांनी छापेमारी सुरु केली आहे. सावेडी उपनगरात सोमवारी (दि.१६) एकाच दिवशी स्थानिक गुन्हे शाखेने २ ठिकाणी तर तोफखाना पोलिसांनी एका ठिकाणी कारवाई करत ५१ हजाराचा नायलॉन मांजा जप्त केला आहे. या प्रकरणी तिघांवर वेगवेगळे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस पथक नगर शहरामध्ये अवैध चायना मांजावर कारवाई करणेसाठी पेट्रोलिंग करीत असताना पोलिस उपनिरीक्षक राजेंद्र वाघ यांना माहिती मिळाली की, नगर शहरातील पाईप लाईन हाडको येथील आंबेडकर चौक येथे आडोश्याला शुभम सुनिल वाघ (रा. पाईप लाईन हाडको, अ.नगर) हा नायलॉनचा चायना मांजाची विक्री करत आहे. या माहिती नुसार पोलिसांनी अचानक छापा टाकून त्यास ताब्यात घेतले. त्याच्याकडे १६ हजार रुपये किमतीचा मोनो के टी सी फायटर कंपनीचे नायलॉन मांज्याचे एकुण १६ रीळ मिळून आले. पोलिसांनी ते जप्त करत शुभम वाघ याच्याविरुद्ध तोफखाना पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला.

दुसऱ्या कारवाईत पोलिसांनी सिव्हींल हाडको येथील गणेश चौकातील घरातून नायलॉन मांजा, चक्री तसेच नायलॉन मांजा गुंडाळण्याची मशीन असा १५ हजार २०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. या कारवाई दरम्यान मांजा विक्री करणारा विकास अरविंद बरकसे (रा. गणेश चौक, सिव्हिल हडको) हा पसार झाला. त्याच्या विरुद्ध तोफखाना पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. सदरची कारवाई पोलिस उपनिरीक्षक राजेंद्र वाघ, पोलिस हवालदार संदीप पवार, मयुर गायकवाड, रविंद्र घुंगासे, चंद्रकांत कुसळकर यांच्या पथकाने केली.

तिसऱ्या कारवाईत तोफखाना पोलिसांनी जुना पिंपळगाव रोडवरील सिद्धिविनायक नगर येथे घरातून नायलॉन मांजा विक्री करणाऱ्या सचिन संभाजी उंडे (वय २८) याच्यावर कारवाई करून त्यास ताब्यात घेतले. त्याच्याकडून पोलिसांनी २० हजार रुपये किमतीचा नायलॉन मांजा जप्त केला.

याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात भारतीय न्यायसंहिता २०२३ चे कलम २२३, १२५, पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ चे कलम ५, १५ अन्वये गुन्ह्याची नोंद करण्यात आली. ही कारवाई तोफखाना पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार अहमद इनामदार, पो.कॉ. दत्तात्रय कोतकर, सतीश भवर, बाळासाहेब भापसे यांनी केली आहे.

# बँकेसमोर लावलेल्या दुचाकीची चोरी

नगर – एमआयडीसी परिसरातील नगर मनमाड रोडवरील भारतीय स्टेट बँकेच्या शाखेसमोर हॅण्डेल लॉक करून लावलेली होंडा कंपनीची शाईन मोटारसायकल (क्र. एम एच १६ बी ए ००३०) कोणीतरी अज्ञात चोरट्याने हॅण्डेल लॉक तोडून बनावट चावीने सुरू करून चोरून नेली.

याप्रकरणी एमआयडीसी पोलिसांनी विनोद बळीराम आडेप (वय ३४,राहणार पाईप लाईन रोड श्रमिक नगर) यांनी दिलेले फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता सन २०२३ चे कलम ३०५ (ब) अन्वये चोरीच्या गुन्ह्याची नोंद केली असून अधिक तपास पोलीस हवालदार चौधरी करीत आहे

# बसस्थानकात बुक स्टॉलमध्ये गुटखा, पानमसाल्याची विक्री

## अन्न व औषध प्रशासन विभागाचा छापा, टपरीचालकावर गुन्हा दाखल

नगर – महाराष्ट्र राज्यात गुटखा, पान मसाला, सुगंधित तंबाखू विक्री करण्यास मनाई असतानाही बसस्थानकात बुक स्टॉल मध्ये गुटखा, पानम साल्याची विक्री करणाऱ्या टपरीचालकावर अन्न व औषध प्रशासन विभागाने कोतवाली पोलिसांच्या मदतीने कारवाई केली. या ठिकाणी विमल पान मसाला, आर.एम.डी. गुटखा, सुगंधित तंबाखू जप्त करत टपरी चालकावर गुन्हा दाखल केला आहे.

शहरातील स्वास्तिक चौकाजवळील पुणे बस स्थानक येथे ही कारवाई करण्यात आली आहे. सलीम मुबारक पठाण (वय ४७, रा.शास्त्रीनगर, केडगाव) असे गुन्हा दाखल झालेल्या टपरीचालकाचे नाव आहे. याबाबत अन्न व औषध प्रशासन विभागाचे अन्न सुरक्षा अधिकारी राजेश बडे यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

बसस्थानकात गुटखा, पानमसाला याची विक्री होत असल्याची माहिती अन्न व औषध प्रशासन विभागाला मिळाली होती. त्यानुसार त्यांनी कोतवाली पोलिसांच्या सहकार्याने नगर पुणे रोडवरील स्वास्तिक चौकाजवळील पुणे बसस्थानकात असलेल्या प्रगती बुक स्टॉल या टपरीवर सोमवारी (दि.१६) सायंकाळी छापा टाकला. पथकाने त्या ठिकाणची तपासणी केली असता त्या ठिकाणी प्रतिबंधित विमल पान मसाला, आर.एम.डी. गुटखा, सुगंधित तंबाखू असा ४ हजार ६०० रुपये किमतीचा माल आढळून आला.

याप्रकरणी अन्न सुरक्षा अधिकारी राजेश बडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी सलीम पठाण यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. अधिक तपास महिला पोलीस उपनिरीक्षक शितल मुगडे या करीत आहेत.

